मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी

तरुणांचा बुलंद आवाज

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १८८ ■ बुधवार, १८ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# गुढीपाडव्यानिमित्त बाजारपेठ विविध साहित्याने सज्ज

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : साडेतीन मुहूर्तपैकी एक मुहुर्त असलेल्या गुढीपाडव्यानिमित्त बाजारपेठ विविध साहित्याने सज्ज झाली आहे. गाठी, गुढीचे साहित्य, नवी काठी यासह पाडव्यासाठी नवी उत्पादने खरेदी करण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिक शहरातील बाजारपेठ मध्ये येत आहे. १९ मार्च रोजी गुढीपाडवा आल्याने बाजारपेठेमध्ये वस्त्र, साखरेची गाठी मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आल्या आहेत.हिंदू नववर्षाचा पहिला दिवस, चैत्र शुक्ल प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा १९ मार्चला साजरा होत आहे. साडेतीन मुहूतपैकिी एक मुहूर्त असणाऱ्या गुढीपाडव्याला हिंदू नववर्षाची सुरुवात होते. गुढीपाडव्याचा खास मान असलेल्या साखरेच्या गाठी या वर्षी विविध रंगांमध्ये उपलब्ध करण्यात आल्या होत्या. किमान २० रुपयांपासून ते १०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. गुढी म्हणजे आनंद, विजय आणि स्वागताचे प्रतीक. उंच बांबूपासून गुढी तयार केली जाते. बांबूच्या एका टोकाला रेशमी कापड, कडुलिंबाचा, फुलांचा हार आणि साखरेची माळ बांधून त्यावर धातूचे भांडे (तांब्या) बसवला जातो. नंतर गुढी पाटावर उभी केली जाते. मात्र आताच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या युगात गुढी उभारण्यासाठी पुरेसा वेळही मिळणे कठीण झाले आहे. याला पर्याय म्हणूनच रेडिमेड गुढीचा नवा ट्रेण्ड निर्माण झाला. टेबलवर, कारमध्ये ठेवता येण्यासारख्या छोट्या गुढीसह मोठ्या रेडिमेड गुढ्या अत्यंत कमी किमतीत ६५ ते २५० रुपयांपर्यंत विविध आकाराच्या गुढ्या बाजारात उपलब्ध आहेत. पाट आणि त्यावर असलेले नक्षीदार कापड, नारळ,



तांब्या, आंब्याची पाने, गुढीभोवती असलेले रेशमी कापड, हार आदी सर्व साहित्याचा समावेश या छोट्या गुढीत पाहायला मिळतो.

### विविध रंगांमध्ये गाठी बाजारात

**गुढीपाडव्याचा खास मान असलेल्या साखरेच्या गाठी या वर्षी विविध रंगांमध्ये उपलब्ध करण्यात आल्या होत्या. किमान २० रुपयांपासून ते १०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. गुढी म्हणजे आनंद, विजय आणि स्वागताचे प्रतीक. उंच बांबूपासून गुढी तयार केली जाते. बांबूच्या एका टोकाला रेशमी कापड, कडुलिंबाचा, फुलांचा हार आणि साखरेची माळ बांधून त्यावर धातूचे भांडे बसवले जाते नंतर गुढी पाटावर उभी केली जाते.**

त्यामुळे या सगळ्या साहित्याची जमवाजमव करण्यापेक्षा या रेडिमेड गुढ्या घेण्याकडेच आता लोकांचा कल वाढत आहे. सुंदर नक्षीकाम, चमकदार कापड व आकर्षक सजावटीमुळे या मनमोहक रेडिमेड गुढ्या खरेदी करण्याचा मोह नागरिकांना सहज होतो. साधारण एक फूट उंचीची असलेली ही गुढी घरात कोठेही सहज ठेवता येते.

---

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त 'निष्पाप' नाटकाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे एक विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या अंतर्गत मुंबई मराठी पत्रकार संघ प्रस्तुत 'निष्पाप' या नाटकाचे विनामूल्य सादरीकरण करण्यात येणार आहे.हा प्रयोग येत्या शनिवारी दिनांक २१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता पनवेल येथील आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडणार आहे. या निमित्ताने रसिकांना दर्जेदार नाट्यप्रयोग पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे. चोवीस तास बातम्यांच्या जगात वावरणाऱ्या पत्रकारांच्या संवेदनशीलता आणि सर्जनशीलतेला रंगभूमीवर योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने मुंबई मराठी पत्रकार संघाने पहिल्यांदाच ६४ व्या राज्य नाट्य स्पर्धेत सहभाग नोंदवला असून पदार्पणातच दोन पुरस्कार पटकावण्याचा मान मिळवला आहे. मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण निर्मित या नाटकासाठी लेखक प्रा. दिलीप परदेशी यांचे प्रभावी लेखन आणि दिग्दर्शक गुरुदत्त लाड यांचे कसदार दिग्दर्शन लाभले आहे. 'निष्पाप' हे नाटक पत्रकारांच्या अभिनयकौशल्याला नवी दिशा देणारे ठरत आहे.

या नाटकात ज्येष्ठ पत्रकार देवदास मटाले आणि स्वाती घोसाळकर प्रमुख भूमिकेत आहेत. तसेच दिग्दर्शक गुरुदत्त लाड यांच्यासह प्रशांत चिडे, रश्मी महांबरे, सिद्धेश शिगवण आणि सुरेश ठुकरुळ यांनीही महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. हा नाट्यप्रयोग सर्वांसाठी विनामूल्य खुला असून, पनवेल आणि परिसरातील नाट्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी केले.

## महाडचे डॉ. हिंमतराव बावस्कर प्रतिष्ठित मेडिकल अँड हेल्थकेअर एक्सलन्स अवॉर्डने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** महाड येथील बावस्कर हॉस्पिटल अँड क्लिनिकल रिसर्च सेंटरचे डॉ. हिंमतराव साळुबा बावस्कर यांना सीताराम जयपूरिया फाउंडेशनतर्फे आयोजित मेडिकल अँड हेल्थकेअर एक्सलन्स अवॉर्ड्सच्या तिसऱ्या एडिशनमध्ये प्रतिष्ठित एक्नोम्लर लीडरशिप इन रूरत मेडिसिन अँड हेल्थकेअर अवॉर्डसह सन्मानित करण्यात आले भारतातील आरोग्य यंत्रणा प्रबळ करणाऱ्या आणि वैद्यकीय समुदायाला प्रेरित करणाऱ्या दिग्गज डॉक्टरांना एकूण ९० लाख रुपयांचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. हा पुरस्कार सोहळा एसजेएफ सायण्टिफिक सिम्पोजियम अँड अवॉर्ड्स प्रोग्रामचा भाग म्हणून नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आला. दिवंगत श्री सीताराम जयपूरिया यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित या दिवसभर चाललेल्या परिसंवादामध्येवैद्यकीय क्षेत्रातील



तज्ञांनी 'लठ्ठपणा, मधुमेह आणि इतर हृदय चयापचयाशी संबंधित आजार या विषयावर चर्चा करण्यासोबत ज्ञानाची देवाणघेवाण केली सीताराम जयपूरिया फाउंडेशनद्वारे आयोजित, तसेच एसजेएफचे अध्यक्ष आणि कॉस्मो फर्स्ट लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अशोक जयपूरिया यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या इव्हेण्टमध्ये नामवंत डॉक्टर, संशोधक आणि आरोग्य सेवा क्षेत्रातील प्रमुख एकत्र आले. याप्रसंगी आरोग्यसेवा क्षेत्रात उद्भवणारी आव्हाने आणि नाविन्यपूर्ण संशोधनांवर चर्चा करण्यात आली मेडिकल अँड हेल्थकेअर एक्सलन्स अवॉर्ड्ससमारोहासह या इव्हेण्टची सांगता झाली, ज्यामध्ये भारतातीलआणि परदेशातील आरोग्यसेवेचे भविष्य घडवणाऱ्या समर्पित व्यक्तींचा आणि त्यांच्या नेतृत्वाचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगती मत व्यक्त करत सीताराम जयपूरिया फाऊंडेशनचे अध्यक्ष आणि कॉस्मो फर्स्ट लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अशोक जयपूरिया म्हणाले, "माझे वडील श्री. सीताराम जयपुरिया यांच्या मानवतावादी मूल्यांच्या मार्गदर्शनाखालीवैद्यकीय समुदायातील सदस्यांच्या अपवादात्मक योगदानाचा सन्मान करताना आम्हाला आनंद होत आहे. आज सन्मानित होत असलेल्या डॉक्टरांनी आरोग्यसेवेच्या प्रगतीसाठी आणि अनेक व्यक्तींचे जीवन सुधारण्यासाठी आपले जीवनसमर्पित केले आहे त्यांची अतूट कटिबद्धता, दयाळूपणा आणि उत्कृष्टतेचा प्रयल यामधून खऱ्या अर्थाने वैद्यकीय व्यवसायातील उदात्त भावना दिसून येते.

---

## शब्दसूरांच्या सुगंधाने चिर्ले येथील 'सुपारी बाग' दरवळली; 'काव्यदबार' आयोजित 'पोपटी काव्य संमेलनात' साहित्याचा जागर!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** "काव्य कवन योगे योगे, एकत्र गुंफू जीवन धागे" या हृदयस्पर्शी ब्रीदवाक्याला प्रमाण मानून, 'काव्यदरबार उरण' संस्थेच्या वतीने आयोजित २०२६ चे भव्य 'पोपटी काव्य संमेलन' रविवार, दिनांक १५ मार्च २०२६ रोजी उरण तालुक्यातील चिर्ले येथील निसर्गरम्य सुपारी बाग अक्षरशः साहित्याच्या रंगात न्हाऊन निघाली.रायगड, ठाणे आणि पालघर या तीन जिल्ह्यांतून आलेल्या थोर साहित्यिक आणि कवींच्या मांदियाळीने या सोहळ्याला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले.

कार्यक्रमाचा प्रारंभ संस्कृती आणि निसर्गाच्या मिलाफाने झाला. मडक्यात शिजणाऱ्या पारंपरिक पोपटीचे कलश पूजन आणि दीपप्रज्वलनाने वातावरणात चैतन्य पसरले. संमेलनाध्यक्षांची निवड आणि उद्घाटनाच्या औपचारिकतेनंतर, 'स्मृती कुंजा'वर बळीराजाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून पुष्पवृष्टी करण्यात आली. दिवंगत



साहित्यिकांना श्रद्धांजली अर्पण करताना काशिनाथ मढवी यांनी स्वरबद्ध केलेले 'मानवंदना गीत' उपस्थितांच्या काळजाला स्पर्शून गेले. प्रास्ताविकातून साहित्याचा हा वारसा अखंड जपण्याचा संकल्प करण्यात आला.

साहित्याच्या चर्चेसोबतच आगरी संस्कृतीचा अस्सल ठेवा असलेल्या 'पोपटी'चा आस्वाद घेत आलेल्या पाहुण्यांनी तृप्तता व्यक्त केली. याच मंगलमयी प्रसंगी समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाने ठसा उमटवणाऱ्या दिग्गजांचा गौरव करण्यात आला. यामध्ये साहित्यिक, डॉक्टर, नाटककार, कीर्तनकार, नाट्य कलाकार, आगरी इतिहासकार आगरी धवल गीते ,आदर्श शिक्षक इत्यादी क्षेत्रातील दिग्गजांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. ज्ञान आणि प्रतिभेचा हा सन्मान सोहळा उपस्थित साहित्यिकांसाठी प्रेरणादायी ठरला. शिवव्याख्याते धीरेंद्र ठाकूर यांनी छत्रपती शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाबद्दल थोडक्यात केलेले वर्णनानेहि वातावरण शिवमय झाले. या कार्यक्रमात रामचंद्र म्हात्रे यांची उणीव प्रकर्षाने जाणवली. या सोहळ्याचे अध्यक्षस्थानी संदेश भोईर, मान्यवरांमध्ये रामनाथ म्हात्रे चंद्रकांत पाटील म.वा.म्हात्रे आदी मान्यवर तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष काशिनाथ मढवी सर ,हरिश्चंद्र माळी खजिनदार ,भ पो म्हात्रे गुरुजी, चंद्रकांत मढवी, मीनल माळी, अरुण द. म्हात्रे ,अरुण ध. पाटील, आदी दिग्गजांनी त्याचप्रमाणे कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन रेश्मा ठाकूर आणि मीनल माळी यांनी आपल्या शैलीत केले या सर्वांचे मोलाचे योगदान व परिश्रमाने निसर्गाच्या सानिध्यात पार पडलेल्या या काव्य सोहळ्याने साहित्याच्या इतिहासात एक सुवर्णपान जोडले गेले.

## 'सन्मान स्त्री शक्तीचा' कार्यक्रम उत्साहात; विविध क्षेत्रातील महिलांचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** जागतिक महिला दिन (८ मार्च) तसेच भारतीय जनता पार्टीचे जिल्हा चिटणीस संजय गाजरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून श्री साई उद्योग समूह यांच्या वतीने 'सन्मान स्त्री शक्तीचा' हा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संजय गाजरे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटनही करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन भाजप प्रदेश सचिव सौ. भैरवीताई पलांडे-वाघ तसेच माजी जिल्हा परिषद सदस्या व पिंपळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका अमृताताई पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा मानाचा फेटा बांधून व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना भैरवीताई पलांडे-वाघ व अमृताताई पवार यांनी संजय गाजरे




यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. मकरसंक्रांतीनिमित्त प्रभागातील महिलांच्या घरांवर त्यांच्या नावाच्या नेमप्लेट लावून देण्याचा उपक्रम तसेच गेल्या वर्षापासून प्रभागातील १८ ते ७० वयोगटातील नागरिकांसाठी अपघात विमा काढण्याचा उपक्रम राबविल्याबद्दल त्यांनी विशेष अभिनंदन केले.

कार्यक्रमात वैद्यकीय व शिक्षण क्षेत्रातील महिलांसह धुणी-भांडी करणाऱ्या महिला, सफाई कामगार, पोलीस कर्मचारी, वकील तसेच आशा सेविका अशा विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान करून स्त्रीशक्तीचा गौरव करण्यात आला.


याप्रसंगी भाजप जिल्हा उपाध्यक्ष संजयजी वाबळे, जिल्हा सरचिटणीस गोविंदराव कुशारे, निफाडच्या नगराध्यक्षा कांताबाई कर्डिले, नगरसेविका रूपालीताई रंधवे, नयना निकाळे, नगरसेवक जावेद शेख तसेच जावेदभाई शेख, सोपान काका खालकर, मुकुंदराव धारराव, अरबाज पठाण, आकाश मोरे, साहेबराव कापसे, धनंजय नागरे, दीपक कुंदे, दिलीप आबा कापसे, मधुकर शेलार, सुनील गाजरे, प्रकाश गाजरे, गाजरे परिवारातील सदस्य, नितीन भाऊ कापसे, रघुनाथराव खापरे, अशोक शेठ पोफळिया, प्रकाश शेठ सुराणा, रामदास तात्या व्यवहारे, साहेबराव बर्डे, बापूसाहेब कुंदे, श्रीपतराव कापडी, विजयकुमार गजभिये, शिवाजीराव भोकनळ, सुनील व्यवहारे, रामदास नाना कर्डिले, ठोके सर, प्रफुल्ल कुलकर्णी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन श्री साई उद्योग समूह यांच्या वतीने करण्यात आले असून उपस्थितांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

---

## मध्यरात्री श्रीवर्धनमध्ये घरफोडी; दोन घरांचे कडी-कोयंडे तोडून चोरट्यांचा डल्ला

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित** : श्रीवर्धन शहरातील सरकारी रुग्णालयाच्या मागील पोतदार चाळ परिसरात सोमवारी (दि. १६ मार्च) मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी दोन घरांचे कडी-कोयंडे तोडून घरफोडी केल्याची घटना उघडकीस आली. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.माहितीनुसार, सरकारी रुग्णालयाच्या मागील बाजूस असलेल्या पोतदार चाळ परिसरात नेहमीच रहिवाशांची वर्दळ असते. मात्र सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दोन घरांचे दरवाजे फोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील मौल्यवान वस्तूंवर डल्ला मारल्याची माहिती समोर येत आहे.सकाळी घरमालक व शेजाऱ्यांच्या लक्षात हा प्रकार आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून परिसरातील नागरिकांकडून माहिती घेतली जात आहे. तसेच परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करून चोरट्यांचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, श्रीवर्धन शहरात अलीकडे चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने



नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## कुसुमाग्रज शिक्षक सन्मान पुरस्कार प्रा.मुरलीधर चौधरी यांना मिळाला

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** नाशिक जिल्हा मराठी अध्यापक संघाच्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय "कुसुमाग्रज शिक्षक सन्मान पुरस्कार" आदिवासी सेवा समिती शिक्षण संस्था नाशिक अंतर्गत महाविद्यालय समाजश्री प्रशांतदादा हिरे महाविद्यालयातील प्रा.मुरलीधर चौधरी यांची निवड करण्यात आली आहे.हा पुरस्कार सोहळा १५ मार्च रोजी कविवर्य कुसुमाग्रज नगरी शिरवाडे वणी येथे पार पडला.यावेळी नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. तात्याराव लहाने यांच्या हस्ते तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला.कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या



जन्मदिनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांना हा पुरस्कार देण्यात येतो.चौधरी यांनी काम करत ज्ञानदानाबरोच विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासाला चालना देण्यासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात यशस्वी ठरले त्यामुळे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.या निवडीबद्दल त्यांचे सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# संविधान बचाव संघर्ष समितीचा 22 मार्च च्या ओबीसी समाजाच्या मोर्चाला पाठिंबा



**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा :** ओबीसी समाजाची जात निहाय जनगणना झाली पाहिजे याकरिता 22 मार्चला होणाऱ्या ओबीसी मोर्चाला संविधान बचाव संघर्ष समिती भंडारा जिल्ह्याच्या वतीने पाठिंबा जाहीर करण्यात आला असून यासंबंधीचे पत्र संविधान संघर्ष समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे यांनी सदानंद इलमे यांना लेखी स्वरूपात दिले . यावेळी सविधान बचाव संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष रोशन जांभुळकर ,जिल्हा सचिव आसित बागडे , इंजिनीयर रूपचंद रामटेके, राजेश मडामे, व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# 32 वर्षांनंतर देवणी तालुक्याला जिल्हा परिषद अध्यक्षपद; सौ उषाताई संभाजीराव पाटील तळेगावकर यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**पांडुरंग कदम/देवणी तालुका प्रतिनिधी :** लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी निलंगा मतदारसंघातील वलांडी गटातून विजयी झालेल्या उषा पाटील तळेगावकर यांची निवड झाली आहे. लातूर जिल्हा परिषदेत भाजपचे 18 सदस्य तर अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे 12 सदस्य असून दोन्ही पक्षांच्या युतीतून सत्ता स्थापन करण्यात आली. या सत्तासमीकरणानुसार अध्यक्षपद भाजपकडे तर उपाध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे देण्यात आले असून उपाध्यक्षपदी दयानंद सुरवसे यांची निवड झाली आहे.

उषा पाटील तळेगावकर या निलंगा विधानसभा मतदारसंघातील महिला (सर्वसाधारण) राखीव वलांडी गटातून निवडून आल्या आहेत. त्या स्वर्गीय रामचंद्र पाटील तळेगावकर यांच्या सून



आहेत. त्यांच्या निवडीमुळे तब्बल 32 वर्षांनंतर देवणी तालुक्याला जिल्हा परिषद अध्यक्षपदाचा मान मिळाला आहे. यापूर्वी माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या कार्यकाळात देवणी येथील सायरा मिर्झा यांनी जिल्हा परिषद अध्यक्षपद भूषवले होते.

निलंगा मतदारसंघात माजी मंत्री तथा चार वेळा आमदार राहिलेले संभाजीराव पाटील निलंगेकर यांचे नेतृत्व महत्त्वाचे मानले जाते. माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचा वारसा पक्ष वेगळे आहे तरी यांचे नातू असलेले संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी मतदारसंघात सामाजिक समतोल राखत सर्व घटकांना न्याय देण्याची भूमिका घेतल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जाते.

देवणी पंचायत समितीच्या सहा गणांपैकी एक ओबीसी, एक अनुसूचित जाती व चार सर्वसाधारण जागांवर सदस्य निवडून आले आहेत. यामध्ये तीन मराठा तर एक लिंगायत सदस्य निवडून आले असताना, सर्वसाधारण सभापतीपदासाठी मराठा दावेदार असतानाही दवन हिप्परगा गणातील लिंगायत समाजाच्या सौ. अंकिता पाटील यांना सभापती करण्यात आले. त्या देवणी शहरातील भाजपचे ज्येष्ठ नेते हावगीराव पाटील यांच्या मुलीच्या सून असून या निर्णयामुळे मतदारसंघात समन्वय साधल्याची चर्चा आहे.

दरम्यान, देवणी तालुका व निलंगा मतदारसंघाला जिल्हा परिषद अध्यक्षपदाचा मान मिळाल्याबद्दल भाजप व इतर पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून आनंद व्यक्त केला जात आहे. देवणी तालुक्यातील शिक्षण महर्षी ओळखले जाणारे भाजपाचे ज्येष्ठ नेते यशवंतराव पाटील मतदारसंघातील ज्येष्ठ नेते हावगीराव पाटील, मनोहरजी पटणे, बाबुराव इंगोले. सोमनाथ लुले . प्लॉटिंग व्यवसायिक प्रमुख चंद्रकांत कदम. हनुमंत कोणाळे. देवणी सोसायटीचे चेअरमन विजयकुमार लूले, देवणी नगर पंचायत नगरसेवक किशोर निडवंचे. शिवाजीराव तपसाळे, धनराज सुरवसे, अमर पाटील, दिलीप मजगे, वैजनाथ आस्टुरे. श्रावण रावळे. बालाजी सूर्यवंशी, मयूर पटणे, नर्सिंग सूर्यवंशी, रमेश मनसुरे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी उषा पाटील तळेगावकर यांचे अभिनंदन केले.

# जांभिवली जिल्हा परिषद सेमी इंग्रजी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या दिमाखात साजरा

**दैनिक युवक आधार**

**खालापूर तालुका/संतोष शेवाळे :** रायगड जिल्हा परिषद सेमी इंग्रजी शाळा जांभिवली येथे दि. १० मार्च रोजी शाळेच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्धाटन जांभिवली ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच प्रमोद शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपसभापती चंद्रभागा मारुती दळवी, वावोशी केंद्राचे केंद्रप्रमुख जयंत पाटील, उपसरपंच सुजीत दळवी, ग्रामपंचायत सदस्य तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नरेंद्र दळवी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद फकिरे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले आणि मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज





आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. या कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर, तालुक्यातील शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, विविध शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, पोषण आहार शिजवणाऱ्या काकू तसेच गावातील जेष्ठ नागरिक यांचा तुळशीचे रोप, पुष्पगुच्छ आणि शाल देऊन शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. शाळेत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात आले होते. त्यामध्ये चित्रकला, रांगोळी, क्रीडास्पर्धा तसेच बौद्धिक स्पर्धांचा समावेश होता. या स्पर्धांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी, मेडल तसेच "शिवाजी कोण होता?" हे पुस्तक देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी देखील या कार्यक्रमाला मोठी रंगत आणली. यावेळी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या कला-संस्कृतीचे दर्शन घडवणारी नृत्ये सादर केली. तसेच व्यसनमुक्ती, सोशल मीडियाचा अतिवापर आणि भारतीय संविधानाचे महत्त्व सांगणाऱ्या नाटिकांमधून सामाजिक संदेश देण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर आणि ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी या कार्यक्रमाला सरपंच प्रमोद दादा शिर्के, उपसरपंच सुजीत दादा दळवी, ग्रामपंचायत सदस्या रंजना येरुणकर, वैजयंता कदम, मेघा शिर्के, आशा मोरे, ग्रामविकास अधिकारी सुवर्णा खराटे, माजी उपसभापती चंद्रभागा मारुती दळवी, जेष्ठ नागरिक सुभाष दाजी मोरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नरेंद्र दळवी, उपाध्यक्षा मेघना मोरे, केंद्रप्रमुख जयंत पाटील, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे सचिव उस्मान शेख सर, कार्याध्यक्ष रवी बत्तीनवार, खजिनदार परशुराम तासतोडे, उपाध्यक्ष भागिनाथ पोटे सर, प्रसिद्धी प्रमुख सुदर्शन आंधळे सर, शिक्षक संघटनांचे नेते उमेश विचारे, सचिव थिटे सर, बळीराम चव्हाण, माजी अध्यक्ष संदीप जाधव, राजेंद्र सावंत, जांभिवली वाडीचे मुख्याध्यापक झावरे सर व झावरे मॅडम, वावोशी फाटा शाळेच्या मुख्याध्यापिका शर्मिला मिसाळ, रानसई शाळेच्या मुख्याध्यापिका नाचण मॅडम, होराळे शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती सुंभे, वावोशीच्या नाना टिळक शाळेच्या मानसी केदारे मॅडम, रानसई शाळेच्या झावरे मॅडम, होराळे शाळेच्या अर्चना घाटे मॅडम, टाटा कंपनीच्या एलईपी टिचर सोनल आंब्रे, अंगणवाडी सेविका सौ. विचारे ताई, सौ. मोरे ताई, आशा वर्कर जयवंती शिर्के, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत दळवी यांच्यासह ग्रामस्थ, महिला मंडळ, पालक व शाळेचे आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य तसेच सर्व पालकांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक प्रमोद फकिरे यांनी आर्थिक सहकार्य करणाऱ्यांसह उपस्थित सर्व मान्यवर, ग्रामस्थ आणि पालकांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# २२ मार्चला पनवेलमध्ये "अवघ्या आशा श्रीरामार्पण"

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** श्री रामनवमी" निमित्त तसेच माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भारतीय जनता पार्टी, सांस्कृतिक सेल उत्तर रायगड यांच्या वतीने विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. "अवघ्या आशा श्रीरामार्पण" या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमातून गीत रामायण च्या माध्यमातून रामतत्त्वाची कालसुसंगत मांडणी सादर केली जाणार आहे. भक्ती, संस्कृती आणि सुरेल संगीताचा संगम असलेल्या या कार्यक्रमात प्रभावी कथन, भावपूर्ण गायन आणि दर्जेदार वाद्यसंगत यांचा आस्वाद रसिकांना घेता येणार आहे.कार्यक्रमात स्नेहल दामले यांचे कथन, अभिजीत पंचभाई व श्रुती देवस्थळी यांचे गायन तसेच उद्धव कुंभार, अमित कुंटे आणि प्रसन्न बाम यांची वाद्यसंगत लाभणार आहे. हा कार्यक्रम रविवार, २२ मार्च २०२६ रोजी रात्री ८ वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे. प्रवेश विनामूल्य असून पनवेल व रायगड परिसरातील नागरिकांनी कुटुंबियांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिमय संध्याकाळीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी अभिषेक पटवर्धन - ८६६८३३२१५९, वैभव बुवा- ९०२९४१०६९९, गणेश जगताप- ९८७०११६९४४ किंवा आदित्य उपाध्ये ८२९११९७५२६ यांच्याशी संपर्क साधावा.

# जंगली डुकराचा थरार! भानपूर गावात धुमाकूळ; ३ वासरे ठार

**उपसरपंच योगेश पतेह यांची जखमींची भेट; वनविभागाकडे मदतीची मागणी**

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** गोंदिया तहसीलच्या भानपूर गावात 8 मार्चच्या रात्री जंगली डुकराने अक्षरशः थैमान घातले. रात्रीच्या अंधारात गावात शिरलेल्या या डुकराने घराघरात घुसून जनावरांवर हल्ला केला, ज्यामध्ये ३ वासरे



ठार तर २ गायी जखमी झाल्या. तसेच, एका ग्रामस्थावर झडप घालून त्याला गंभीर जखमी केले आहे.घटनेची माहिती मिळताच भानपूरचे उपसरपंच योगेश पतेह यांनी तत्परता दाखवत जखमी ग्रामस्थाची रुग्णालयात जाऊन भेट घेतली व प्रकृतीची विचारपूस केली. डुकराने केवळ जनावरांचेच नव्हे, तर घरातील अन्नधान्याचेही मोठे नुकसान केले आहे.उपसरपंच योगेश पतेह यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून या हिंस्त्र डुकराचा तात्काळ बंदोबस्त करण्याची आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. सध्या गावात प्रचंड भीतीचे वातावरण असून, वनविभागाने ठोस पावले उचलावीत, असा सूर उमटत आहे.

# सरकार आमच्या घराचे स्वप्न कधी पूर्ण करणार !; अन्यायग्रस्तांचा न्यायासाठी आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** मुंबईतील रेल्वे मार्गालगत अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या हजारो झोपडीधारकांना पुनर्वसनाचे गोड स्वप्न दाखवण्यात आले. पण आजही अनेक कुटुंबे न्यायाच्या प्रतीक्षेतच आहेत. आयुष्यभर कष्ट करून, मुलाबाळांसह छोट्या झोपडीत आयुष्य काढणाऱ्या या नागरिकांना आजही स्वतःच्या घराची आस लागलेली आहे.

"आम्ही वर्षानुवर्षे आशा धरून बसलो आहोत. सरकारने आम्हाला घर देण्याचे आश्वासन दिले होते. पण आता आमच्याच हक्काची घरे दुसऱ्यांना विकली जात असल्याचे ऐकून आमच्या पायाखालची



जमीनच सरकली," असे दुःखी शब्द अनेक बाधित नागरिक व्यक्त करत आहेत.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व सर्वेक्षण कंपन्यांवर कठोर कारवाई करावी आणि खऱ्या बाधित झोपडीधारकांना तातडीने न्याय देण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष युवक जिल्हाध्यक्ष सचिन लोंढे यांनी केली आहे.

रेल्वे विभाग, MRVC आणि MMR-DA यांच्या माध्यमातून बाधित नागरिकांचे सर्वेक्षण करून त्यांचे पुनर्वसन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात अनेक पात्र नागरिकांना घरे न देता, त्यांच्या नावावर असलेली घरे परस्पर इतर व्यक्तींना विकल्याचा गंभीर आरोप सचिन लोंढे यांनी केला आहे. त्यामुळे गरीब आणि कष्टकरी कुटुंबांमध्ये प्रचंड नाराजी आणि असंतोष निर्माण झाला आहे.

# रानमेव्याच्या विक्रीने आदिवासी महिलांना बेगमी कमाई

**रेवदंडा बाजार सुगंधाने मातकटत आहे**

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** चैत्र-वैशाखाच्या हंगामात जंगल परिसर सुगंधाने दरवळत असताना, रानमेव्याच्या विक्रीने आदिवासी महिलांच्या घरखर्चाला बळ मिळाले आहे. ओले काजू, हिरवी करवंदे, फालसा, तोरण, आवळा, आंब्याच्या कैऱ्या, रानबोरा यांसारख्या नैसर्गिक फळांच्या विक्रीतून स्थानिक बाजारपेठेत रंग भरला असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे.पहाटे चार वाजता जागी होऊन आदिवासी महिला जंगलात रानमेवा गोळा करण्यासाठी निघतात. दोन-तीन तासांच्या कष्टानंतर हातात येणारा हा रानमेवा दुपारी बाजारात विक्रीसाठी आणला जातो. "दिवसभराची मेहनत, दुसऱ्या दिवशी बाजारात



विक्री आणि ५०० ते १००० रुपये कमाई! सणासुदीत घर सजवायला आता पैसे मिळतात," असे रेवदंडा बाजारातील आदिवासी महिला लक्ष्मी बाई सांगतात. ओल्या काजूला किलोला २०० रुपये, करवंदेला १०,२०,५० वाटा, फालसाला १०० रुपये मिळत असल्याने हंगामी रोजगाराची हमी मिळाली आहे.हे रानफळे पूर्णपणे सेंद्रिय आणि रसायनेमुक्त असल्याने पर्यटकांचीही खरेदीला प्राधान्य आहे. मुंबई, पुणे येथून येणारे पर्यटक 'नैसर्गिक आरोग्यवर्धक फळे' म्हणून मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. "व्हिटॅमिन सीने भरपूर आवळा, कॅल्शियमयुक्त करवंदे आणि लोहाने समृद्ध फालसा – हे फळे रोगप्रतिकारशक्ती वाढवतात आणि उन्हाळ्यातील उष्णतेचा सामना करण्यास मदत करतात," असे आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. सुनील पाटील सांगतात.रेवदंडा बाजारात सकाळपासून ग्राहकांची लगबग सुरू होते. "रानमेव्याच्या विक्रीमुळे आम्हाला फक्त कमाईच नाही, तर जंगल संरक्षणाची जबाबदारीही वाटते. हा निसर्गाची अनमोल भेट आहे," असे आदिवासी रामचंद्र घाटगे म्हणाले. या विक्रीमुळे ग्रामीण महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळत असून, स्थानिक प्रशासनानेही याला प्रोत्साहन देण्यासाठी 'रानमेवा बाजार' योजना राबवावी, अशी मागणी होत आहे.हंगामी रोजगाराने आदिवासी कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद परतला असून, रेवदंडा बाजार रानमेव्याच्या चवीने लज्जतदार झाला आहे. हा काळ आदिवासी बांधवांसाठी आर्थिक समृद्धीचा सोनेरी काळ ठरत आहे.

# महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयकाला सभागृहात पाठिंबा; आमदार प्रशांत ठाकूर याचे जोरदार समर्थन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** राज्यात जबदस्तीने किंवा प्रलोभनाव्दारे धर्मांतर रोखण्यासाठी सरकारने प्रस्तावित केलेला 'महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य कायदा २०२६' हा कोणत्याही धर्माच्या विरोधात नसून नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठीचा एक अत्यंत आवश्यक निर्णय आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले. धर्मस्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण आणि बेकायदेशीर धर्मांतरांना आळा घालण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात सादर केलेल्या विधेयकाचे स्वागत करण्यात आले आहे.या विधेयकावर बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनीही सर्वप्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानत या विधेयकाचे स्वागत केले. यावेळी त्यांनी राज्यातील विविध भागांमध्ये विशेषतः आदिवासी व अनुसूचित जमातींमध्ये तसेच शहरी भागातही योजनाबद्ध पद्धतीने धर्मांतराचे प्रयत्न सुरू असल्याची बाब अधोरेखित केली. पनवेल, खारघर यांसारख्या भागांमध्येही असे प्रकार घडत असल्याचे नमूद करत, या प्रवृत्तीला रोखण्यासाठी कठोर कायद्याची गरज असल्याचे सांगण्यात आले. इतिहासातील छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदानाचा उल्लेख करत, धर्म आणि स्वाभिमान जपण्याची परंपरा महाराष्ट्रात असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे धर्मरक्षणासाठी ठोस पावले उचलणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. विधेयकातील ३० दिवसांच्या नोटीससारख्या तरतुदींबाबत बोलताना, धर्मांतर स्वेच्छेने की प्रलोभनातून होत आहे याची पडताळणी करण्यासाठी ही तरतूद आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. तसेच सामुदायिक धर्मांतराच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठीही हे विधेयक उपयुक्त ठरेल, असे नमूद करण्यात आले. सदर विधेयक योग्य वेळी सादर करण्यात आले असून, संपूर्ण सभागृहाने यास पाठिंबा देऊन मंजुरी द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. धर्मांतराच्या अनुषंगाने विखारी प्रचार चालतो आणि त्या माध्यमातून धर्मांतर करण्याचा प्रयत्न होतो. अशा पद्धतीचे प्रकार शहरांमध्ये सुद्धा अगदी माझ्या मतदारसंघांमधल्या




पनवेल खारघर यासारख्या ठिकाणी सुद्धा अशा धर्मांतराचे प्रयत्न चालू आहेत आणि म्हणून असेच महाराष्ट्रभर प्रयोग सुरु आहेत त्यामुळे अशा सर्व या प्रयत्न थांबवण्यासाठी हे विधेयक आणले आहे त्याचे मी प्रथम स्वागत करतो आणि माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करतो. धर्मांतरविरोधी विधेयकाला काही सदस्यांनी केलेला विरोध हा देशाच्या सांस्कृतिक जडणघडणीविरोधातील मानसिकतेतून प्रेरित असल्याची टीका सभागृहात करण्यात आली. या विधेयकाच्या विरोधकांचा उद्देश केवळ त्यांच्या मतदारसंघात स्वतःला धर्मरक्षक म्हणून सादर करण्याचा असल्याचा आरोपही करण्यात आला. सभागृहात बोलताना अबू आझमी यांनी, "हे विधेयक कचऱ्याच्या कुंडीत फेकले पाहिजे, असे वक्तव्य केले होते. त्या वक्तव्याचा खरपूस समाचार घेत विरोधकांची मानसिकता चिंताजनक असल्याचे नमूद केले. तसेच यावरूनच या विधेयकाची आवश्यकता अधोरेखित होते, असेही त्यांनी स्पष्टपणे म्हंटले. पनवेल परिसरामध्ये तळोजा, खारघर सारख्या परिसरात जाणीवपूर्वक वेगवेगळ्या पद्धतीच्या धार्मिक कार्यक्रमांचा आयोजन करून एक भीती निर्माण करण्याचा प्रयत्न होतोय आणि याच्या विरोधामध्ये समाजाला ताकद देण्यासाठी काम आवश्यक असेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी गजवा ए हिंद, पीएफआय अशा काही संघटनांचा उल्लेख करत, बंदी असूनही अशा संघटनांचे अस्तित्व शहरांमध्ये कायम असल्याचा आरोप केला. तसेच, अशा प्रकारच्या कृतींना संबंधित समाजातून विरोध का होत नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. धार्मिक अतिक्रमण, बेकायदेशीर कृती आणि समाजावर दबाव निर्माण करण्याच्या घटनांकडे लक्ष वेधत, या सर्व पार्श्वभूमीवरच हे विधेयक आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. समाजात संतुलन राखण्यासाठी आणि बेकायदेशीर धर्मांतरांना आळा घालण्यासाठी हे विधेयक महत्त्वाचे असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी रोखठोकपणे मत मांडताना सांगितले.

# नगरसेविका ममता प्रितम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली “सखी कर्तृत्वाचा सन्मान” उत्साहात

## "समाजाच्या विविध स्तरांवर शांतपणे जिद्दीने काम करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा पनवेलमध्ये गौरव"

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी तसेच त्यांना स्वयंरोजगार, उद्योग आणि प्रॉडक्ट मार्केटिंगच्या नव्या संधींबाबत मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने “सखी कर्तृत्वाचा सन्मान” हा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. नगरसेविका सौ. ममता प्रितम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था आणि गार्गीज् ग्रुप, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १५ मार्च २०२६ रोजी भा.ज.पा. प्रितम जनार्दन म्हात्रे जनसंपर्क कार्यालय, पनवेल येथे आयोजित करण्यात आला होता.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर सौ. प्रमिला पाटील, ॲड. स्मिता पाटील, डॉ. सुप्रिया सहस्रबुद्धे, सौ. अर्चना परेश ठाकूर (कोशिश फाउंडेशन) या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच मा. नगराध्यक्ष चारुशीला घरत, नगरसेविका सरस्वती काथारा, दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, प्रियंका कांडपिळे, सारिका भगत, अरुणा दाभणे, वंदना बहिरा, रेणुका मोहकर, मंजुळा कातकरी तसेच अर्बन बँकेच्या संचालिका सौ. माधुरी गोसावी यांचीही विशेष उपस्थिती होती.

या प्रसंगी उपस्थित नगरसेविकांचा तसेच समाजाच्या विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे समाजाच्या पायाभूत स्तरावर निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या स्वच्छता कर्मचारी, हॉस्पिटलमधील आया, अंगणवाडी सेविका व मदतनीस तसेच शाळांमधील आया या महिला कर्मचाऱ्यांचा “सखी कर्तृत्वाचा सन्मान” या माध्यमातून गौरव करण्यात आला.

या सन्मान सोहळ्यात विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेक प्रेरणादायी महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. परंपरागत बुरूड व्यवसाय जपणाऱ्या श्रीमती सुलोचना पांडुरंग खैरे (वय ८५) आणि श्रीमती सुशीला अनंत खैरे (वय ८०) यांनी जवळपास सहा दशकांहून अधिक काळ हा व्यवसाय जपल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या सौ. दिपा दिलीप पनवेलकर, श्रीमती स्मिता सदानंद साखरे, कमकुबेन भारवाड आणि ज्योतीबेन चावडा यांचा सन्मान करण्यात आला. सुरक्षा क्षेत्रात प्रामाणिक सेवा देणाऱ्या सौ. वनिता मेघराज मांजरेकर (१९ वर्षे सेवा) आणि सौ. अनिता रामचंद्र माळी (अमिटी युनिव्हर्सिटी येथे ५ वर्षे सेवा) यांचाही गौरव करण्यात आला.

सामाजिक कार्यासाठी शुभा चंदेरी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांनी आदिवासी समाजातील महिलांना लोणचे बनवण्याचे प्रशिक्षण देऊन बचत गट उभारणे, प्रदर्शनांमध्ये स्टॉलची संधी उपलब्ध करून देणे तसेच आरोग्य जनजागृती, वृक्षारोपण आणि दारूमुक्ती मोहिमेद्वारे समाजकार्य केले आहे.

महिलांच्या स्वयंपूर्णतेसाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या सौ. शैला दीपक खाडे यांचाही सन्मान करण्यात आला. त्यांना सोशल एंटरप्रेन्योर, रायगड भूषण, महाराष्ट्र भूषण आणि महाराष्ट्राची हिरकणी असे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

स्वतःच्या कष्टातून कुटुंब उभे करणाऱ्या टिफिन व केटरिंग व्यवसायातील श्रीमती सुरेखा चाळके, सौ. सारिका तुपे आणि श्रीमती सुलभा विठ्ठल धनावडे यांचा सन्मान करण्यात आला. वाहतूक क्षेत्रात कार्य करणाऱ्या सौ. अनिता विजय मागडे (शाळा बस चालक) आणि सौ. आशा दादासाहेब घालमे (रिक्षा चालक) यांचाही गौरव करण्यात आला.

अंगणवाडी क्षेत्रात दीर्घकाळ सेवा देणाऱ्या सौ. अरुणा किसन गवते (४१ वर्षे सेवा) आणि श्रीमती सुनिता अशोक पाटील (२० वर्षे सेवा) यांचा सन्मान करण्यात आला. तसेच आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या सौ. शोभा हरिश्चंद्र जाधव, सौ. दर्शना महादेव पाटील आणि सौ. सुनीता रमेश जाधव या आशा वर्कर महिलांचाही गौरव करण्यात आला. नर्सिंग क्षेत्रात उल्लेखनीय सेवा देणाऱ्या सौ. विशाखा विजयकुमार ठाकूर (२४ वर्षे सेवा, NMMC वाशी) यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.याशिवाय विशेष सन्मानामध्ये सौ. अपेक्षा जगदीश वाघमारे (ग्रामसखी), तेजस्विनी संदीप गोंधळी (Heaven In A Bite), श्रीमती सीमा अजय शेटे, सौ. नूतन संकेत रानडे, बेबीताई, सौ. हेमा दीपक कुदळे तसेच महिला पोलीस शिपाई साधना मोहन पवार यांचा गौरव करण्यात आला.पनवेल व परिसरातील विविध सामाजिक संस्थांच्या कार्याचाही यावेळी सन्मान करण्यात आला. यामध्ये पनवेल स्मार्ट मम्मीज् (सौ. शितल रितेश ठक्कर), एकता महिला मंडळ (अध्यक्षा सौ. सुनिता गोविंद खरे), संवेदना महिला मंडळ (फाउंडर सौ. सुनेत्रा प्रसाद गव्हाणकर), डायमंड फाउंडेशन (फाउंडर सौ. नम्रता ज्ञानदेव धनवडे), जागृती फाउंडेशन (अध्यक्ष सौ. गौरी क्षीरसागर), दिशा मंच (फाउंडर सौ. नीलम विकास अंधारे), छत्रपती महिला ग्रामसंघ विचुंबे (अध्यक्षा सौ. रंजना विश्वनाथ सुरते), सहकार भारती महानगर जिल्हा पनवेल महिला प्रमुख ॲड. सौ. अपर्णा सुधीर नाडगौडी, सप्तशृंगी महिला मंडळ कळंबोली (अध्यक्षा सौ. ज्योती रविंद्र पाटील) आणि वाणी समाज मंडळ पनवेल (अध्यक्षा सौ. पूजा प्रसाद साखरे) यांचा समावेश होता.कार्यक्रमात महिलांसाठी स्वयंरोजगार, उद्योगाच्या संधी तसेच प्रॉडक्ट मार्केटिंग व सेलिंग या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. महिलांनी आत्मनिर्भर व्हावे आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे असा संदेश यावेळी देण्यात आला.कार्यक्रमात उपस्थित महिलांसाठी भेटवस्तू तसेच लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले होते. PNG ज्वेलर्स आणि द्वारकादास श्यामकुमार यांच्या सहकार्याने लकी ड्रॉसाठी आकर्षक बक्षिसे देण्यात आली.कार्यक्रमाला परिसरातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित राहिल्या होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजकांनी घेतलेल्या प्रयत्नांचे सर्वांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवर, सहभागी महिला आणि सर्व सहकार्यकर्त्यांचे गार्गीज ग्रुपच्या फाउंडर सौ.रश्मी मोरे यांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

**“समाजात अशा अनेक महिला आहेत ज्या कोणताही गाजावाजा न करता, प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता प्रामाणिकपणे आपल्या कामाशी निष्ठा ठेवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असतात. त्या सोशल मीडियावर किंवा मोठ्या मंचांवर दिसत नसल्या तरी त्यांच्या परिश्रमामुळे समाजाची भक्कम पायाभरणी होते. ‘सखी कर्तृत्वाचा सन्मान’ या उपक्रमाच्या माध्यमातून अशाच विविध स्तरांवर शांतपणे काम करणाऱ्या महिलांचे प्रतिनिधित्व म्हणून काही निवडक महिलांचा सन्मान करून त्यांच्या कार्याला मानाचा मुजरा देण्याचा आमचा प्रयत्न आहे.”**

**सौ.ममता प्रितम म्हात्रे**
**भाजपा नगरसेविका**
**पनवेल महानगरपालिका**

# मुंबई भाजपा महिला मोर्चा अध्यक्षपदी योजना ठोकळे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/ प्रतिनिधी :** मुलुंड, भारतीय जनता पार्टीच्या मुंबई महिला मोर्चा अध्यक्षपदी योजना ठोकळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी त्यांच्यावर विश्वास दाखवत ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली आहे. या नियुक्तीबद्दल ठोकळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पक्षातील सर्व वरिष्ठ नेत्यांचे मनःपूर्वक आभार मानले.



नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना योजना ठोकळे यांनी सांगितले की, “हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा आणि भावनिक क्षण आहे. मी बौद्ध समाजातील, सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेली मुलगी असून सामाजिक क्षेत्रात काम करत असतांना आंबेडकरी चळवळीशी नाळ जोडलेली असून अनेक सामाजिक,शैक्षणिक योजनांचा लाभ महिलांना मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.” संविधान जागर यात्रा संयोजिका म्हणुन महाराष्ट्र भर संविधानाची जनजागृती केली. २०२५ ला त्यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले होते. त्या पुढे म्हणाल्या की, “मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरात एका राष्ट्रीय पक्षाच्या सामान्य कार्यकर्तीपासून महिला मोर्चाच्या मुंबई अध्यक्षपदापर्यंत पोहोचणे ही मोठी जबाबदारी आहे. पक्षनिष्ठा, संयम आणि संघटन कौशल्य असेल तर पक्ष नक्कीच कार्यकर्त्यांना न्याय देतो, याचा हा पुरावा आहे.”

योजना ठोकळे यांनी सांगितले की, पक्षाने दिलेल्या या पदाचा उपयोग करून त्या महिला मोर्चाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी जोमाने काम करणार आहेत. शहरातील अधिकाधिक महिलांना पक्षाशी जोडणे, त्यांचे प्रश्न ऐकून त्यावर काम करणे आणि महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवणे यासाठी त्या विशेष प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

“तुमचा विश्वास ही माझी ताकद आहे आणि पक्षाचे संस्कार हा माझा मार्ग आहे. शब्दांपेक्षा कृतीतून काम करून दाखवणे हेच माझे ध्येय असेल,” असेही त्यांनी यांनी सांगितले.

# सिल्लोडच्या इंद्रराज महाविद्यालयात १३ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

## सक्षम महिला पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात; मान्यवरांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** शहरातील इंद्रराज कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, महिला सक्षमीकरण समिती, जायंट्स ग्रुप ऑफ नवचेतना (छत्रपती संभाजीनगर) आणि वर्धमान नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त 'सक्षम महिला पुरस्कार' वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १३ महिलांना यावेळी सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव माननीय अशोकराव देवरे होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. योगिता होके-पाटील उपस्थित होत्या. प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. जी. राजपूत , उपप्राचार्य डॉ. व्यंकटेश लांब हे होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. यावेळी डॉ. योगिता होके-पाटील यांनी महिला सक्षमीकरणासाठी शिक्षण, आत्मविश्वास आणि समान संधीचे महत्त्व अधोरेखित केले.



कार्यक्रमात डॉ. पल्लवी गोपालसिंग राजपूत (वैद्यकीय अधिकारी, आळंद), श्रीमती रत्नमाला संजय भुईगळ (महावितरण टेक्निशियन), श्रीमती वंदना चंद्रकांत हिवराळे (पोलीस कॉन्स्टेबल), श्रीमती अश्विनी गणेश भोंबे (मोटर ड्रायव्हिंग प्रशिक्षक), श्रीमती अर्चना किशोर सोनार (विमा सल्लागार), श्रीमती विजया किसनराव लाड (आशा सेविका), श्रीमती रेखा विश्वासराव गाडे (मुख्य कार्यकारी अधिकारी, पूर्ण अर्बन बँक), श्रीमती तानाबाई आळणे (लघुउद्योजिका), श्रीमती वैशाली नरेंद्र पाटील (नगरसेविका), श्रीमती अनिता व्यंकटराव डुमणे (मंडळ अधिकारी, बोरगाव बाजार), श्रीमती गंगा रमेश उदणे (पॅथॉलॉजी लॅब), श्रीमती अंजना कौतिक मिरगे (दुर्गामाता भोजनालय) आणि श्रीमती कल्पना गवळी फाळके (ग्रामपंचायत अधिकारी) या १३ महिलांना 'सक्षम महिला पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुचिता देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मनीषा मुगळीकर यांनी केले, तर आभार श्रीमती ज्योती तोमर यांनी मानले. या सोहळ्यास नागरिक, विद्यार्थी व महिलांची मोठी उपस्थिती होती.

# साई मंदिरात आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## २० जणांचे रक्तदान, ७० रुग्णांची तपासणी

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे / लाखनी तालुका प्रतिनिधी :** मुरमाडी/सावरी येथील साई मंदिर परिसरात आयोजित मोफत कॅन्सर निदान व आरोग्य तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात २० जणांनी स्वेच्छेने रक्तदान केले, तर सुमारे ७० रुग्णांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ५ ते ६ रुग्णांमध्ये कॅन्सरची लक्षणे आढळून आल्याने त्यांना पुढील तपासणी व उपचारासाठी तज्ञ डॉक्टरांकडे जाण्याचा सल्ला देण्यात आला.




हे शिबिर निमा असोसिएशन भंडारा यांच्या आयोजनातून तसेच बारस्कर मल्टिस्पेसिऍलिटी हॉस्पिटल अँड डायलिसिस सेंटर , नागपूर यांच्या सहकार्याने पार पडले. या शिबिरासाठी डॉ. चंद्रकांत निंबार्ते व जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीषा निंबार्ते यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच निमा असोसिएशन भंडारा चे अध्यक्ष डॉ. राजेश चंदवानी व सचिव डॉ. रुपेश दुरुगकर यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. शिबिरात उपस्थित डॉक्टरांनी कॅन्सरची लक्षणे, प्रतिबंधक उपाययोजना व वेळेवर निदानाचे महत्त्व याबाबत नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन केले.कॅन्सरचे प्राथमिक अवस्थेत निदान झाल्यास उपचार शक्य होतात, त्यामुळे नागरिकांनी नियमित आरोग्य तपासणी करावी, असे आवाहन डॉक्टरांनी केले. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेतला.

# प्राथमिक शाळा वाजे येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान अंतर्गत द्वितीय शिबिर मोरबे महसूल मंडळामध्ये रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाजे येथे 14 मार्च रोजी आयोजित करण्यात आले. यावेळी प्रशांत ठाकूर, आमदार, पवन चांडक, उपविभागीय अधिकारी पनवेल, जितेंद्र इंगळे, अपर तहसीलदार पनवेल व इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी जात प्रमाणपत्र, वय व अधिवास प्रमाणपत्र, स्थानिक वास्तव्य प्रमाणपत्र अशा विविध दाखल्यांचे या ठिकाणी वाटप करणेत आले, तसेच नवीन अर्ज दाखल करुन घेणेत आले.





निवासी नायब तहसिलदार संभाजी शेलार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. इतर प्रशासकीय विभागाकडील अधिकारी यांनी आपापल्या विभागाकडील योजनांची माहिती सदर अभियानात देण्यात आली. तसेच स्टॉल लावून शासनाच्या विविध प्रकारचे दाखले व योजना नागरिकांना लाभ देण्याकरिता सोय उपलब्ध करून देण्यात आली. वाजे गावच्या स्थानिक महिला बचत गटाच्या भगिनींनी पुढाकार घेवुन तेथे घरगुती लोणचे, पापड व इतर साहित्य यांचे स्टॉल लावून विक्रीसाठी तरतुद केली होती. तसेच वाजे येथील अंगणवाडी सेविका यांनी त्यांच्या बाल संगोपन उपक्रमाचा स्टॉल लावून माहिती दिली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती उपसभापती, नायब तहसिलदार सुनिल जाधव, मोरबे मंडळातील सर्व आजी माजी सरपंच व सदस्य, पोलीस पाटील उपस्थित होते. शैलेश कोंडसकर पनवेल न्यायालय यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल व्याख्यान देऊन त्यांच्या कार्याची माहिती दिली. तसेच न्याय विभागाकडून देण्यात येणाऱ्या विविध योजना यांची माहिती दिली. वैशाली जाधव, उपअधीक्षक भूमी अभिलेख नैना प्राधिकरण यांनी त्यांच्या कार्यालयाच्या स्तरावरील नागरिकांना आवश्यक सर्व वेबसाईटची माहिती दिली, तसेच ऑनलाईन सुविधांची माहिती दिली. लादे, सह दुय्यम निबंधक पनवेल यांनी तुकडेबंदीच्या दस्तनोंदणीच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही याबाबत मार्गदर्शन केले. संभाजी शेलार, निवासी नायब तहसीलदार यांनी महसूलमधील विविध कामांची व योजनांची माहिती दिली.

मौजे- वाजे गावाचा नकाशा ग्रामपंचायत वाजेचे सरपंच यांना देण्यात आला. धोदाणी ते चिंचवाडीकडे जाणारा रस्ता याची मोजणी प्रक्रीया पुर्ण झाल्यामुळे त्याचा नकाशा व 7/12 उपस्थित ग्रामस्थ यांना देण्यात आला. तसेच महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या सहकार्यातून रक्तदान शिबीर घेणेत आला त्यात 21 रक्तदात्यांनी रक्तदान केले. यानंतर उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्रमांक 1 ची अंमलबजावणी करणेबाबत सर्व नागरीकांना मार्गदर्शन केले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान व अन्य प्रशासकीय बाबींवर मार्गदर्शन केले.

# डांग सेवा मंडळ संचलित महाविद्यालयात कॉस्मेटिक, हर्बल व फूड प्रॉडक्ट विषयावर मार्गदर्शनपर कार्यशाळा संपन्न; दैनिक उपयोगी उत्पादनाची माहिती

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी - दिपक गायकवाड/बागलाण :** मुल्हेर ता.बागलाण येथील डांग सेवा मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने कॉस्मेटिक, हर्बल अँड फूड प्रॉडक्ट या विषयावर विशेष मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या विविध उत्पादनांची माहिती मिळावी तसेच प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे त्यांची निर्मिती कशी करावी याचे मार्गदर्शन मिळावे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून जनकल्याण शिक्षण संस्था नाशिक येथील सहाय्यक अधिकारी वैष्णवी हेमाडे, ताहाराबाद महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्या प्रा. व्ही. एस. रौंदळ, प्राचार्य डॉ. डी. ए. सोनवणे, उपप्राचार्य एस. एल. पंडित, विद्यार्थी विकास कल्याण मंडळाचे अधिकारी के. डी. मोर, विज्ञान शाखेचे विभागप्रमुख प्रा. एम. बी. अग्निहोत्री, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. पी. एस. शिरसाठ, तसेच कार्यक्रम समन्वयक व्ही. टी. येवला हे उपस्थित होते.



कार्यक्रमाचा शुभारंभ प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा. रौंदळ व वैष्णवी हेमाडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पी. एस. शिरसाठ यांनी केले. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास घडवून आणणे तसेच लघुउद्योग व स्वयंरोजगाराच्या संधींबाबत जागृती निर्माण करणे हा या कार्यशाळेचा उद्देश असल्याचे प्रस्ताविकातून प्रा.प्राजक्ता शिरसाठ यांनी स्पष्ट केले. तसेच प्रा. व्ही. एस. रौंदळ मॅडम यांनी विद्यार्थ्यांना एबीपी पॅटर्न २०२४ विषयी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर मर्यादित न राहता प्रॅक्टिकल नॉलेज घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रम समन्वयक वर्षा येवला यांनी विद्यार्थ्यांना फूड प्रॉडक्ट तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले. पनीर, टोमॅटो सॉस तसेच इतर पदार्थ तयार करून त्यामधून शरीराला मिळणारे कार्बोहायड्रेट्स व प्रथिने याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच कॉस्मेटिक प्रॉडक्ट घरगुती पद्धतीने कसे तयार करता येतात याचे मार्गदर्शन करण्यात आले. हरबल प्रॉडक्टमध्ये घरगुती पदार्थांपासून विविध उत्पादने कशी तयार होतात याची प्रात्यक्षिकेही दाखविण्यात आलीत.कार्यशाळेत मसाला, खोकला पावडर, पान मुखवास, टोमॅटो सॉस, गुलाब जल, तापावरील औषध, दातदुखी पावडर, पनीर, लिंबू सरबत, शाम्पू, भांडी क्लीनर, फेस वॉश, मॉइश्चरायझर, साबण व परफ्यूम यांसारखी विविध उत्पादने तयार करून दाखविण्यात आली.

या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. प्रशांत अहिरे, जय सुमित गवळी, मेहता, नितीन पवार, श्रेया जैन, सायली करनार, रेणुका सोनवणे, वैशाली माळी, गायत्री बिरारी, दिपाली बोरसे, अनिता भोई, उर्मिला अहिरे, गणेश अहिरे, पंकज, रितिका विश्वंभर, निकिता गवळी, सोनाली गवळी, प्राजक्ता, जय, तुषार आदी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून कार्यशाळेचा आनंद घेतला.कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला तसेच दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या विविध उत्पादनांची माहिती मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नव्या कल्पना, संशोधनाची आवड तसेच स्वावलंबनाची भावना निर्माण झाली. कार्यशाळेदरम्यान परीक्षकांनी विद्यार्थ्यांना हर्बल व कॉस्मेटिक उत्पादनांच्या निर्मितीबाबत तसेच त्यामधील रसायनांच्या उपयोगाबाबत विविध प्रश्न विचारले व विद्यार्थ्यांनी त्यांची समाधानकारक उत्तरे दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पवार व प्रा.व्ही.एम.अहिरे यांनी केले तर आभार प्रदर्शन एम. डी. सूर्यवंशी यांनी केले. यावेळी कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी ए.सोनवणे,उपप्राचार्य सुनील पंडित, विज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. एम. बी. अग्निहोत्री, रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. शिरसाठ मॅडम, वाणिज्य विभाग प्रमुख के.जी बागुल, कला विभाग प्रमुख प्राध्यापक के डी मोर, प्राध्यापक जे.व्ही.शुक्ल, प्रा.अनिता गांगुर्डे, प्रा. वर्षा येवला, प्रा. एम बी गवळी प्रा. ए.ए.पवार, प्रा. वि.एम. अहिरे, प्रा. जी एस सोनवणे, प्रा. बहिरम, प्रा. एम.बी अहिरे, प्रा. के.यु.साबळे, प्रा. डी.आर.भुसारे, प्रा. टी. एन जगताप , प्रा. एम डी सूर्यवंशी , एस.एस. कुलकर्णी, एम.व्ही.पिंगळे, परदेशी मॅडम व प्रकाश लाडे यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## समर्थ नगरमध्ये माकडांची दहशत; नागरिकांचा वनविभागावर संताप

**भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी/लाखनी -** लाखनी शहरातील समर्थ नगर मुरमाडी परिसरात माकडांचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत असून नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. दिवसातून तीन वेळा माकडांचे टोळ्या परिसरात अचानक आक्रमण करत असल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

माकडे घरांच्या अंगणात वाळवायला ठेवलेले अन्नपदार्थ खातात तसेच आंबा, चिकू, पपई यांसारखी फळझाडे उद्ध्वस्त करतात. याशिवाय घरासमोरील फुलझाडे आणि इतर रोपेदेखील माकडे उपटून टाकत असल्याने नागरिकांचे आर्थिक नुकसान होत आहे. माकडांच्या या सततच्या धुमाकुळामुळे महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, या समस्येबाबत वनविभागाकडे अनेकदा तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. "वनविभाग फक्त सागवान झाडांच्या व्यवहारातच व्यस्त आहे काय?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. समर्थ नगर परिसरातील नागरिकांनी वनविभागाने तातडीने या समस्येकडे लक्ष देऊन माकडांचा बंदोबस्त करावा, अन्यथा नागरिकांना लोकशाही मार्गाने आंदोलनाचा मार्ग अपनावा लागेल .

## कष्टाला सलाम! नंधानाच्या युवकाचा राज्यभर गाजलेला पराक्रम

**गोरख पाटील बोरकर यांना 'राज्यस्तरीय आदर्श उपसरपंच सन्मान 2026' जाहीर हलाखीच्या परिस्थितीतून उभा राहिलेला प्रेरणादायी जीवनप्रवास**

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : रिसोड (वाशिम)दि.17 मार्च 2026 रिसोड तालुक्यातील मौजे नंधाना येथील एक सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील युवक आज राज्यस्तरावर आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहे. गोरख उद्धवराव बोरकर पाटील या तरुणाला सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने "राज्यस्तरीय आदर्श उपसरपंच सन्मान 2026" जाहीर झाल्याने संपूर्ण वाशिम जिल्ह्यात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून स्वतःची ओळख निर्माण करत गोरख पाटील यांनी "जनसेवा हीच ईश्वर सेवा" हे तत्व अंगीकारून समाजकार्यात स्वतःला झोकून दिले. लहानपणापासूनच सामाजिक, राजकीय व वैचारिक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग घेत त्यांनी जनसामान्य, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी अशा सर्व घटकांसाठी काम केले.

सन 2016 मध्ये आदर्श ग्रामपंचायत नंधाना येथे प्रथमच छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करून गावात शिवविचारांचे वादळ निर्माण केले. त्यानंतर 2018 मध्ये गावात दारूबंदीचा ठराव मंजूर करून नंधाना गाव दारूमुक्त करण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यामुळे ते दारूबंदी करणारे पहिले उपसरपंच म्हणून ओळखले जाऊ लागले.

2019 मध्ये केवळ 18 व्या वर्षी ग्रामस्थांनी त्यांची बिनविरोध तंटामुक्ती अध्यक्ष म्हणून निवड केली. त्याच वर्षीपासून कबड्डी प्रेमींसाठी भव्य स्पर्धांचे आयोजन करून गावातील युवकांना सकारात्मक



दिशा दिली.कोरोना काळात गावात निराशेचे वातावरण असताना त्यांनी पालेभाज्यांचे वाटप, जनजागृती मोहीम राबवून नागरिकांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. 2022 पासून महापुरुषांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिरांचे आयोजन करून सामाजिक बांधिलकी जपली.शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी मोठे योगदान दिले. जिल्हा परिषद शाळेचा दर्जा उंचावण्यासाठी CCTV कॅमेरे, लॅब सुविधा, RO पाणी अशा आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच गावातील रस्ते व शेतपथासाठी निधी खेचून आणत पारदर्शकपणे कामे पूर्ण केली.

गोरख पाटील यांच्या या सर्व कार्याचा गौरव म्हणून त्यांना "राज्यस्तरीय आदर्श उपसरपंच पुरस्कार 2026" जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार सोहळा रविवार, दि. 5 एप्रिल 2026 रोजी सकाळी 11 वाजता अहिल्यानगर येथील माऊली संकुल सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.या सोहळ्यात खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील, ग्रामसेवक नेते एकनाथराव ढाळणे आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मान होणार आहे.गोरख पाटील बोरकर यांच्या या यशाबद्दल वाशिम जिल्ह्यातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत असून, त्यांच्या कार्याची प्रेरणा अनेक युवकांना दिशा देणारी ठरत आहे.

## जोगेश्वरी (पूर्व) परिसरातील पाणीपुरवठ्याच्या समस्येकडे तातडीने लक्ष द्यावे – राष्ट्रवादी युवक काँग्रेसची मागणी

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर,मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** जोगेश्वरी (पूर्व) येथील जेव्हीएलआर रोड परिसरातील श्री चंडिका देवी स्मशान टेकडी रहिवासी संघाच्या परिसरात गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठा अत्यंत कमी दाबाने आणि अपुरा होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे मुंबई प्रदेश सचिव अजित म्हामुणकर यांनी महापालिकेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

म्हामुणकर यांनी के/पूर्व विभागातील पाणी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, जोगेश्वरी (पूर्व) येथील जेव्हीएलआर रोड, एचबीटी ट्रॉमा केअर हॉस्पिटलसमोरील श्री चंडिका देवी स्मशान टेकडी परिसरात अनेक कुटुंबे वास्तव्यास आहेत. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून या भागात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून होणारा पाणीपुरवठा अत्यंत कमी दाबाने होत असून अनेक वेळा नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नाही. परिणामी परिसरातील नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून पिण्याचे पाणी, स्वच्छता व आरोग्याशी संबंधित मूलभूत गरजा पूर्ण करण्यात अडचणी निर्माण होत आहेत.नागरिक नियमितपणे कर भरत असूनही त्यांना मूलभूत सुविधा वेळेवर मिळत नसल्याची नाराजीही स्थानिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे



महापालिका प्रशासनाने या समस्येची तातडीने दखल घेऊन योग्य त्या उपाययोजना करून नियमित व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने याकडे तात्काळ लक्ष न दिल्यास स्थानिक रहिवाशांच्या वतीने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या वेळी उद्भवणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी पूर्णपणे महापालिका प्रशासनावर राहील, असेही म्हामुणकर यांनी स्पष्ट केले आहे.

स्थानिक नागरिकांच्या अडचणी लक्षात घेता प्रशासनाने तातडीने योग्य ती कार्यवाही करून परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी अपेक्षा रहिवाशांकडून व्यक्त होत आहे.

# मालेगाव–आमखेडा मार्ग झाला 'मृत्यूचा सापळा'; अधिकाऱ्यांची केवळ व्हिजिटची भाषा"

**"पत्रकारांना टाळाटाळ, जनतेच्या जीवाशी खेळ; मालेगाव–आमखेडा रस्त्यावर प्रशासन कधी जागे होणार?"**

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशिम जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव ते आमखेडा तसेच बोरगाव–पिंपळा–आमखेडा हा रस्ता गेल्या अनेक महिन्यांपासून खड्ड्यांनी विदीर्ण झाला असून नागरिकांसाठी अक्षरशः मृत्यूचा सापळा ठरत आहे. या गंभीर समस्येबाबत अनेक वेळा बातम्या प्रकाशित होऊनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचे चित्र दिसत आहे.

या पार्श्वभूमीवर दैनिक युवक आधारच्या जिल्हा प्रतिनिधींनी संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग वाशिम यांच्याशी संपर्क साधून प्रकाशित झालेल्या बातमीची दखल घेण्यात आली का, याबाबत विचारणा केली. मात्र त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी "माझी जेव्हा व्हिजिट असेल तेव्हा जाऊन पाहतो… सध्या मी मिटिंगमध्ये आहे, नंतर फोन करतो," असे सांगत उडवाउडवीचे उत्तर दिल्याची माहिती






समोर आली आहे.

यावरून आता नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. "अधिकाऱ्यांनी असे सांगितले की माझी जेव्हा व्हिजिट असेल तेव्हा मी जाऊन पाहतो; पण ही व्हिजिट नेमकी कधी होणार? यासाठी एखादा मुहूर्त काढावा लागणार आहे का?" असा सवाल नागरिक विचारत आहेत. इतक्या गंभीर अवस्थेत असलेल्या रस्त्याची पाहणी करण्यासाठीही जर मुहूर्ताची वाट पाहावी लागत असेल, तर तोपर्यंत एखाद्याचा अपघात होऊन मृत्यू झाला किंवा कोणाचा हात-पाय मोडला, मोठी दुखापत झाली तरच अधिकारी त्या ठिकाणी जाणार का, असा संतप्त प्रश्न जनतेतून उपस्थित होत आहे.

> **"जनता हीच खरी मालक असून अधिकारी व कर्मचारी हे जनतेची सेवा करण्यासाठी आहेत. मात्र आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की जनतेच्या अडचणी ऐकून घेण्याऐवजी टाळाटाळ केली जात आहे. मालेगाव–आमखेडा व बोरगाव–पिंपळा–आमखेडा हा धोकादायक रस्ता तातडीने दुरुस्त करून नागरिकांना दिलासा द्यावा. तसेच निष्काळजीपणा करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी."**
>
> **— स्थानिक नागरिक, बोरगाव, पिंपळा, आमखेडा**

तसेच "जनतेच्या कामासाठी अधिकाऱ्यांनी मुहूर्त बघून जायचे का? की एखाद्याचा जीव गेल्यानंतरच त्या ठिकाणी जाण्याचा मुहूर्त निघणार?" असा सवालही आता सर्वसामान्य नागरिक विचारू लागले आहेत. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच अधिकारी त्या ठिकाणी व्हिजिट देणार का? असा प्रश्न आता लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांच्या मनाला सतावत आहे.

दरम्यान मालेगाव–आमखेडा तसेच बोरगाव–पिंपळा–आमखेडा मार्गावर इतके मोठमोठे खड्डे पडले आहेत की वाहन चालवणे तर दूरच, पायी चालणेही धोकादायक झाले आहे. शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक दररोज जीव धोक्यात घालून या रस्त्यावरून प्रवास करत आहेत.

अनेक वर्षांपासून या रस्त्याची दुरुस्ती होत नसल्याने प्रशासनाच्या उदासीनतेबद्दल नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. आता तरी संबंधित अधिकाऱ्यांनी या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन रस्त्याची ताबडतोब दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## अष्टपैलु व्यक्तिमत्त्व प्रमोद न सूर्यवंशी यांना राज्यस्तरीय विकासरत्न प्रेरणा पुरस्कार 2026 जाहीर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई | प्रतिनिधी :** समृद्धी पर्यटन सांस्कृतिक सेवा विकास ट्रस्ट यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय विकासरत्न प्रेरणा पुरस्कार 2026 हा पुरस्कार यंदा प्रमोद सूर्यवंशी यांना जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराबाबत त्यांना अधिकृत निवडपत्र देण्यात आले आहे.

ट्रस्टच्या संस्थापिका मीनाक्षी पाखरे यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यटन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा सन्मान दिला जातो. यावर्षी विविध



क्षेत्रांतील योगदान लक्षात घेऊन प्रमोद सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली आहे.

या संदर्भातील पुरस्कार वितरण सोहळा 19 एप्रिल रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात येणार आहे. त्या कार्यक्रमात त्यांना राज्यस्तरीय विकासरत्न प्रेरणा पुरस्कार 2026 देऊन गौरविण्यात येणार आहे.

या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याचा गौरव होत असून सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना यामुळे प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सत्कार!!

**दैनिक युवक आधार**

**मराठवाडा प्रतिनिधी/ श्री.रमेश सुरशे :** "स्व मदत" या पुण्यातील प्रतिथीयश वकील आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या ग्रुपने दिनांक 9 मार्च 2026 रोजी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने एका आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

"स्व मदत" च्या प्रकाशक आणि संचालिका ॲड.पियाली घोष तसेच संचालिका ॲड.अनिशा फणसळकर आणि संचालिका ॲड .सुरेखा दाबी यांनी या कार्यक्रमाचे आयोजनासाठी मेहनत घेतली. सदरील कार्यक्रम शिवसमर्थ हॉल रामबाग कॉलनी कोथरूड येथे पार पडला. सदरील कार्यक्रमात माननीय अनुराधाताई सहस्त्रबुद्धे ज्ञानदेवीच्या संचालिका, माननीय राणीताई खेडीकर, बालकल्याण समिती अध्यक्ष पुणे, डॉक्टर रजनी इंदुलकर, महाराष्ट्र राज्य होमिओपॅथी साठी सल्लागार, मिस अंजना प्रधान, जागतिक विक्रमाची गवसणी घालणाऱ्या ताई,यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली.

सदरील कार्यक्रमात प्रत्येक वक्त्यांनी आपापल्या आयुष्याचा जीवनपट उलगडला. त्या सर्वांचेच अनुभव समृद्ध करणारे पण मन हेलावून सोडणारे होते. माननीय अनुराधाताई यांनी



चाईल्डलाईन कडे येणाऱ्या तसेच ज्ञानदेवीकडे येणाऱ्या संकटात सापडलेल्या मुलांच्या कथा आणि व्यथा तसेच पॉक्सो ॲक्ट मधील तरतुदी आणि प्रत्यक्षातील त्याची अंमलबजावणी यात असणारी तफावत निदर्शनास आणून दिली.

माननीय राणीताई खेडीकर यांनी वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांची मुले आणि त्यांच्या व्यथा यावर प्रकाश टाकला.ताईंची त्यात पीएचडी असून प्रदीर्घ असा अनुभव गाठीशी आहे. अशा मुलांना अन्य मुलांसारखे वागवले न गेल्यामुळे त्यांना पडणारे प्रश्न, हतबलता यावर त्यांनी भाष्य केले.डॉ.रजनी मॅडम यांनी परदेशात असताना प्रतिकूल परिस्थितीत अडकल्यामुळे जीवनाला कशी नवीन दिशा मिळाली आणि त्यानंतर पेटून उठून त्यांनी आजवरचा आपला प्रवास कसा सिद्ध केला याचेवर भाष्य केले. स्त्रियांनी स्वतःकडे कसे लक्ष द्यावे आणि कसे सक्षम बनावे याकरता महत्त्वाचे मुद्दे त्यांनी मांडले.

माननीय अंजना ताई यांचे कार्य देखील सर्वांसाठी खूपच प्रेरणादायी आहे. लहानपणी पोलिओ सारख्या आजाराला बळी पडल्यामुळे मिळणारी वेगळी वागणूक आणि त्यातूनच हट्टाने पेटून खूपच प्रतिकूल परिस्थितीत स्वतःला सिद्ध करत जिथे सामान्य माणूस सर्व काही असून साध्या साध्या गोष्टीत कुरकुर करतो तिथे अंजनाताईंनी केवळ जिद्दीच्या जोरावर अकरा वेळा महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसुबाई हे पार केले तसेच स्वतःचाच हा विक्रम मोडण्यासाठी 21 वेळा हे शिखर पार केले आणि जागतिक विक्रम केला. तसेच जागतिक अपंग दिनानिमित्ताने चढाईस अत्यंत अवघड असा किल्ले तोरणा सर केला आणि दोन दिवसांनी लगेचच हरिहर गड सर केला. दिव्यांग असूनही ताईंनी स्विमिंग मध्ये अव्वल येत अनेक वेळा बक्षीसे प्राप्त केली आहेत.सदरील कार्यक्रमाचे वेगळेपण म्हणजे अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वांना वकील प्रेक्षकांमधून आलेले निवडक प्रश्न विचारून टॉक शो सदरामध्ये कार्यक्रमाचे नियोजन केले गेले. सर्व प्रश्नांना मान्यवरांनी अत्यंत उत्स्फूर्तपणे उत्तरे दिली. मात्र सर्वांचे अनुभव आणि समाजातील निर्विकार वृत्ती आणि असहकाराची भावना यामुळे कशा अडचणी आल्या आणि त्यावर कशी मात केली गेली. याविषयी सर्वच वक्त्यांनी खूप सहज सोप्या शब्दात प्रेक्षकांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास जास्तीत जास्त वकील वर्गाची उपस्थिती होती.

प्रसंगी सर्व मान्यवरांचा हृदयस्थ सत्कार शॉल मोमेंटो आणि आठवण रुपी भेट देऊन करण्यात आला. तसेच याप्रसंगी महिला क्रिकेट टीम आणि बॅडमिंटन टीम मधील विजेत्या वकील महिला वर्गाचा सत्कारही करण्यात आला. तसेच याप्रसंगी वकील वर्गातून धडाडीने कार्य करणाऱ्या महिला वकील, ॲड .मिताली साळवेकर, ॲड.ईशानी जोशी, ॲड .सुषमा यादव, ॲड.माधवी परदेशी, ॲड .सारिका परदेशी यांचा उचित सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि सर्व व्यवस्था स्वमदत च्या तिन्ही संचालकांनी उत्तमपणे पार पाडली. कार्यक्रमानंतर मान्यवर आणि सर्व उपस्थितांसाठी ठेवलेल्या सुग्रास भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## उरण मध्ये जेएनपीटी परिसरात गंभीर स्वरूपी अपघात, धडा पासून शीर अलग

**दैनिक युवक आधार**

**प्रदीप पाटील :** उरण न्हावाशेवा पोलीस ठाण्याच्या हाद्दीमध्ये गणेश बेंझोप्लास्ट कंपनीच्या समोरील रस्त्यावर जेएनपीटी कडून पीयूबी इमारतीकडे जाण्याच्या वायजंक्शन रोडवर मोठा अपघात झाला.आहे. या अपघातात सुषिलकुमार भैय्यालाल यादव वय 33 वर्षे व्यवसायाने चालक, राहणार अहीरोली, कुथुपूर, मढीयाहूं, जि. जौनपूर, राज्य उत्तरप्रदेश 222161 यांचा अपघातात मृत्यू झाला आहे.हा अपघात इतका भयंकर स्वरूपाचा होता कि सदरच्या अपघतामध्ये सुषिलकुमार यादव याचे शीर धडापासून वेगळे झाले होते. अपघाताची माहिती पोहवा गणेश बासरे(19090) यांनीं न्हावाशेवा पोलीस ठाण्यात खबर दिली असता कोणताही विलंब न लावता न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे एपीआय श्रीकांत नायडू यांनी आपल्या सहकाऱ्या समवेत घटनास्थळाला भेट दिली. मृत व्यक्तीच्या अंगावर आधार कार्ड, अनुज्ञप्ती आणि वन प्लस कंपनीचा मोबाईल सापडला घटनेची प्राथमिक तपासणी श्री नायडू यांनी करून अज्ञात वहानाने सदरच्या इसमास जोरदारपणे ठोकर मारून कोणत्याही प्रकारची माहिती न देता पळून गेला असल्याचे नमूद करूनउपचरा साठी दाखल केले असता येथील डॉक्टरानी त्यास दाखलपूर्व मयात म्हणून घोषित केले. न्हावाशेवा पोलीस ठाण्यात या आपघताची नोंद अ.मृ.रजी.क्र.03/2026 अशी कलम 194 BNSS अन्वये करण्यात आली असून न्हावाशेवा पोलीस या अपघाताचा अधिक तपास करीत आहेत .

## वाळूघाट मानवत तालुक्यातील, वाहतूक पाथरी तालुक्यातुन

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** पाथरी/ मानवत तालुक्यातील गोदावरी नदी वरील वांगी येथील वाळूघाट सुरू झाला आहे मात्र वाळूघाट मानवत तालुक्याचा आणि वाहतूक पाथरी तालुक्यातुन या घाटाची वाहतूक होत असल्याने मुदगल येथील नागरिकांना नाहक त्रास या वाळू वाहतूकीचा होत आहे या वाळू घाटावरील वाहने रात्री बेरात्री चालूच असतात या वाळू वाहतूकीने अक्षरशः मुदगल येथील नागरिकांची झोप उडाली आहे तर मुदगल या गावातुन रस्ता गेलेला असल्यामुळे या वाहनाने धुळ रस्त्याच्या कडेला असणाऱ्या घरामध्ये धुळीचे लोट रात्रीन दिवश चालू असल्याने अक्षरशःमुदगलकर हैराण झाले आहेत या कडे कोणाचेही लक्ष नाही.पाथरी पोलिस तहसील उपजिल्हाधिकारी यांनी तरी ही रात्री बेरात्री चालूच असणारी वाळू वाहतूक बंद करून मुदगलकरांना या धुळीपासून व बेरात्रीच्या वाहतूकीपासून सुटका करावी व जो कोणी या वांगी वाळूघाटाचा लिलाव धारक आहे त्यांनी एक दिवस मुदगल येथे येऊन प्रत्यक्ष पाहणी करावी आणि या रस्त्यावर पाणी टाकून धुळीचा बंदोबस्त करावा अन्यथा मुदगल येथील ग्रामस्थ पाथरी तहसील कार्यालयावर मोर्चा काढतील यांची तातडीने गांभीर्याने नोंद घ्यावी अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत

## पनवेल शहर पोलिसांनी केला रिक्षा चालका कडून हजारो रुपये किमतीचा गांजा हस्तगत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर ) :** पनवेल शहर पोलिसांनी सोसायटी नाका ब्रिजच्या खाली टाकलेल्या छाप्यात हजारो रुपये किमतीचा गांजा हा अमली पदार्थ हस्तगत केला असून या प्रकरणी एका इसमास ताब्यात घेतले आहे . पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ( गुन्हे ) शाकिर पटेल , सपोनि प्रवीण फडतरे,सपोनि सुनील वाघ ,पो उपनिरीक्षक देवकाते, पो. ना . नामदेव पडळकर आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून आरोपी हिमानल्लू सोमनाथ गंठेपागू ( वय ३५ ) या रिक्षा चालकाकडे ताबेकब्जात ४१६ ग्रॅम वजनाचा एकुण अंदाजे २१,०००/-रू. किंमतीचा 'गांजा' हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःचे कब्जात बेकायदेशिररित्या बाळगले स्थितीत असताना मिळुन आला म्हणुन त्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

## धर्मांतर रोखण्यासाठी कडक कायदा गरजेचा; पण सामाजिक सलोखा अबाधित ठेवणेही तितकेच महत्त्वाचे”

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** महाराष्ट्र विधानसभेत मांडण्यात आलेल्या “महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक 2020” वर आज जोरदार चर्चा झाली. बळजबरी, फसवणूक आणि आमिष दाखवून होणाऱ्या धर्मांतराच्या घटनांना आळा घालण्यासाठी हा कायदा आवश्यक असल्याचे मत मांडण्यात आले, तर दुसरीकडे या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत अनेक गंभीर प्रश्नही उपस्थित करण्यात आले.

विधेयक मांडताना सांगण्यात आले की, मागील काही वर्षांत बेकायदेशीर धर्मांतराच्या घटना वाढल्या असून त्यामुळे सामाजिक सलोखा बिघडण्याचा धोका निर्माण झाला आहे. सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी आणि संविधानाने दिलेल्या धर्मस्वातंत्र्य हक्काचे संरक्षण करण्यासाठी हा कायदा आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या विधेयकानुसार बळजबरी, फसवणूक, आमिष किंवा दबाव टाकून धर्मांतर करणे हा दंडनीय गुन्हा ठरणार असून अशा प्रकारचे धर्मांतर शून्य (अवैध) घोषित करण्यात येणार आहे. संबंधितांना कारावास व दंडाची तरतूदही करण्यात आली आहे.

मात्र, चर्चेदरम्यान या कायद्याबाबत अनेक शंका उपस्थित करण्यात आल्या. हा कायदा सर्व धर्मांसाठी समानपणे लागू होणार का, धार्मिक संस्था, शैक्षणिक संस्था किंवा प्रवचन यांनाही त्यात समाविष्ट केले जाईल का, तसेच आंतरधर्मीय विवाहांवर याचा परिणाम होईल का, याबाबत स्पष्टता देण्याची मागणी करण्यात आली.

सभागृहात बोलताना काही सदस्यांनी देशातील सामाजिक एकतेचा मुद्दा अधोरेखित करत, भारत हा विविध धर्म आणि जातींनी एकत्र नांदणारा देश असल्याचे सांगितले. पूर्वी हिंदू-मुस्लिम एकतेची परंपरा होती, मात्र सध्याच्या काळात वाढत्या धार्मिक तणावाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली.

तसेच, काही भागांमध्ये मुली पळवून नेणे आणि धर्मांतर केल्याच्या घटनांचा उल्लेख करत कठोर कारवाईची मागणी करण्यात आली. आदिवासी व दुर्गम भागात आमिष दाखवून धर्मांतर घडवून आणले जात असल्याचेही सांगण्यात आले.

कायद्याच्या अंमलबजावणीवर विशेष भर देत, तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करावी आणि निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली.

याचबरोबर, धर्मांतरासाठी मदत करणाऱ्या व्यक्तींवरही कारवाई करण्याची तरतूद अधिक स्पष्ट करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. बेकायदेशीर धर्मांतराच्या बळी पडलेल्या व्यक्तींना पुनर्वसन आणि आर्थिक मदत देण्याबाबतही स्पष्ट धोरण असावे, असे मत व्यक्त झाले.

चर्चेदरम्यान काही सदस्यांनी लोकसंख्या नियंत्रण कायद्याची मागणी करत, जादूटोणा आणि वशीकरण यांसारख्या बाबींचाही या कायद्यात समावेश करण्याची सूचना केली.शेवटी, हा कायदा कोणत्याही एका धर्माविरोधात नसून सर्वांसाठी समान असावा, तसेच सामाजिक ऐक्य आणि संविधानिक मूल्ये जपणारा असावा, यावर भर देण्यात आला. कायद्याचा राजकीय फायद्यासाठी वापर होऊ नये, अशीही सूचना सभागृहात करण्यात आली

## रेशीमबाग व सिरसपेठ भागात आज सकाळी वीज नाही

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** एबी स्विच मेंटेनन्स, रिजम्परिंग, क्रिम्पिंग, तसेच वीजवाहिन्यांना अडथळा ठरणारी झाडांची छाटणी आणि इतर तांत्रिक दुरुस्तीसाठी मंगळवार 17 मार्च रोजी सकाळी 8 ते 11 या वेळेत आयुर्वेदीक वाहिनीचा वीजपुरवठा खंडित करण्यात येणार आहे. यामुळे रेशीमबाग, सिरसपेठ आणि आयुर्वेदिक वाहिनीशी जोडलेल्या भागातील वीजपुरवठा बंद राहील. वीजपुरवठा सुरळीत आणि सुरक्षित ठेवण्यासाठी ही कामे अत्यंत महत्त्वाची आहेत. कामाचे स्वरूप पाहता, निर्धारित वेळेत वीजपुरवठा खंडित ठेवावा लागत आहे. तरी या काळात होणाऱ्या गैरसोयीबद्दल महावितरण दिलगीर असून, ग्राहकांनी कृपया सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.

## मा.तानाजी(बाबा) निंबाळकर यांचा सणसर विविध कार्यकारी सोसायटीतर्फे सत्कार

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय :** इंदापूर अर्बन बँकेचे नवनिर्वाचित संचालक मा. तानाजी निंबाळकर यांची निवड झाल्यानंतर सणसर विविध कार्यकारी सोसायटीतर्फे त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला गावातील अनेक मान्यवर उपस्थित राहून अभिनंदन केले.सत्कार सोहळ्यात माजी उपसरपंच विक्रम भैय्या निंबाळकर,नितीन



काटकर,चेअरमन रमेश निंबाळकर,व्हा.चेअरमन सचिन फुले,माजी चेअरमन सुशील निंबाळकर परशुराम रायते संचालक औदुंबर पाटील,पिंटू गुप्ते,सौ. रेखाताई निंबाळकर,सौ. सीमा निंबाळकर,सौ.राहुल काळे,महेंद्र चव्हाण,सोमनाथ जगताप,गोपाळ शितोळे, रोहित निंबाळकर सचिव संजय सपकळ,तसेच तुषार निंबाळकर उपस्थित होते. कार्यक्रमात माजी उपसरपंच विक्रम निंबाळकर यांनी तानाजी निंबाळकर यांच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत तालुक्यातील वरिष्ठ नेत्यांचे आभार मानून त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या सभासदांनी या निवडीचे स्वागत करून भविष्यातील इंदापूर अर्बन बँकेच्या प्रगतीसाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरेल,असा विश्वास व्यक्त केला.

## रायगड अलिबाग चौल सागमळा

### एमएसआयडीसीच्या चुकीच्या गटार कामाने ग्रामस्थांच्या जीवावर बेतली!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे /अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील चौल सागमळा येथे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या (एमएसआयडीसी) स्टॉर्म वॉटर ड्रेनेज सिस्टमच्या अर्धवट व दोषपूर्ण बांधकामामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये प्रचंड संताप आणि भीती निर्माण झाली आहे. पावसाळ्यात डोंगरमाथ्यावरून जोर धावणाऱ्या पाण्याचा निचरा चुकीच्या पद्धतीने होत असल्याने ग्रामस्थांच्या घरात पूर येण्याची, बागायती नष्ट होण्याची व जीवितहानी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून, याबाबत ग्रामस्थ जोरदार चर्चा करीत आहेत.

**"गटार कामातील गंभीर त्रुटी"**

गटाराच्या एका बाजूचे केवळ बांधकाम झाले असून, दुसरी बाजू व पूर्ण पडती बांधली



जाणार नाही, असे स्थानिक ग्रामस्थ सूर्यकांत पाटील व इतर रहिवाशांना सांगितले जात आहे.राम मंदिराजवळील संपन्न हॉटेलकडे जाणाऱ्या मार्गाखालील गटार कमी उंचीचे व खालचा सिमेंट कॉंक्रीटचा कोबा उंच असल्याने पाणी उलट दिशेने वाहून घरात घुसण्याची भीती.सिमेंट कॉंक्रीटचे बांधकाम वर-खाली होऊन लेव्हलमध्ये त्रुटी असून, प्रोजेक्ट मॅनेजर मुर्गन यांनी चौकशी केल्यास "मला विचारू नका, काम बंद आहे" असे उत्तर दिले.

ग्रामस्थांच्या उदरनिर्वाहावर अवलंबून असलेल्या बागायतींना धोका निर्माण झाल्याने संतापी ग्रामस्थ "जगो या मरो" च्या मानसिकतेत असून, कॉन्ट्रॅक्टरवर विश्वास उरणे नाकारत आहेत. ज्या ठिकाणी गटार बांधकाम झाले तेथील मालकांकडून केवळ काम साधले जाणार असून, बाकी ग्रामस्थांना कोणतेही न्याय मिळणार नाही, अशी चर्चा आहे.

**बंद पाकिटातील गुपिते?**

ग्रामस्थांमध्ये अनधिकृत बांधकाम व बंद दारांमागे गुपिते लपवली जात असल्याची जोरदार चर्चा होत असून, यात कॉन्ट्रॅक्टर व अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचे संशय व्यक्त केले जात आहेत. पावसाळ्यात उद्धवेल भयानक परिस्थिती व पूरग्रस्त झाल्यास केंद्र व महाराष्ट्र शासन कोण जबाबदार?, असा सवाल उपस्थित करीत ग्रामस्थ संतप्त झाले आहेत.

**"जनतेची मागणी "**

तात्काळ चौकशी व कारवाई एमएसआयडीसीचे पहिले व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, राज्यपाल आचार्य देवव्रत व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ लक्ष देऊन चुकीच्या कामाची चौकशी करावी व दोषींवर कारवाई करावी, अशी ग्रामस्थांची मागणी जोर धरू लागली आहे. अन्यथा पावसाळ्यात होणाऱ्या दुर्दैवी प्रकारासाठी शासन जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

## रोटरी क्लब पनवेल ईलाईट टाऊन च्या ३७ व्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबीर संपन्न



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर ) :** रोटरी क्लब पनवेल ईलाईट टाऊन च्या ३७ व्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबीर हा उपक्रम संपन्न झाला . यावेळी अध्यक्ष निलेश पोटे यांनी ६८ वे रक्तदान केले . या प्रसंगी मोठ्या प्रमाणात सदस्यांनी रक्तदान करून वर्धापन दिन साजरा केला .

## मोठ्या जनावरांचे बीफ वर्गीय मांसाची वाहतूक, गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पांढऱ्या रंगाच्या वाहनामध्ये मोठ्या जनावरांचे बीफ वर्गीय मांसाची अनधिकृतपणे वाहतूक केल्याप्रकरणी रितेश दाजीराम मोहिते (रा. जुना बारामती रोड, फलटण, सातारा) याच्याविरोधात 13 मार्च रोजी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.12 मार्च रोजी रात्री साडेबाराच्या सुमारास प्रतिक ननावरे यांना एम एच 12 व्हिटी 3580 या वाहनांमधून बीफ वर्गीय मांस मुंबईच्या दिशेने वाहतूक होणार असल्याचे समजले. त्यानुसार ते त्यांच्या मित्रांसोबत खारघर टोल नाका येथे थांबले आणि खारघर पोलिसांची मदत मागितली. यावेळी पहाटे अडीचच्या सुमारास एक गाडी आली. या गाडीमध्ये बीफ वर्गीय मांसाचे तुकडे आढळून आले. त्याने ते मांस अकलूज, सोलापूर येथील कत्तलखान्यातून आणल्याचे सांगितले

# पनवेल-उरण पाणी प्रश्नावर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार

## आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांचा पाठपुरावा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी ) :** सिडकोमार्फत पनवेल व उरण परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मांडलेल्या सूचनेनुसार स्टेमसारखी स्वतंत्र प्राधिकरण (ऑथॉरिटी) कार्यान्वित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित केली जाणार असल्याची माहिती राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत पाणी पुरवठा प्रश्नासंदर्भात सिडकोकडून नागरिकांची होणारी फसवणूक अधोरेखित करून या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधले. या प्रश्नावर उपमुख्यमंत्री महोदयांकडून निवेदनात उत्तर सकारात्मक नसल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांनी या उत्तरावर आक्षेप नोंदवला. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात पाणी प्रश्नावर सडेतोड भूमिका मांडली. उत्तराच्या अनुषंगाने सिडकोने जर उत्तराची ब्रिफींग दिली असेल तर त्या माध्यमातून सिडकोने शासनाची दिशाभूल केली असल्याचे सांगितले. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक, सहव्यवस्थापकीय संचालकांकडे सातत्याने जाऊन लोकांच्या पाणी प्रश्नाबाबत आवाज उठवतो. पाणी मिळावे यासाठी लोकांना मोर्चे आंदोलन, करावी लागतात सिडकोच्या घेतला टाळे ठोकावे लागते मात्र सिडको प्रशासनावर त्याचा कुठलाही परिणाम होत नाही. उत्तरात २०५० पर्यंतच्या १२७५ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या पाण्याच्या व्यवस्थापनाचा रोडमॅप बनवला असे सांगितले जाते आणि तिथेच नमूद केले आहे कि २३ एमएलडी पाण्याची तूट आहे. सप्टेंबर २०२१ पासून १० दशलक्ष, २०२२ पासून ३० दशलक्ष वाढ केली असे सांगितले जाते. जर ४० दशलक्ष वाढ केली तर २३ दशलक्ष पाण्याची तूट कशी आली याचा अर्थ असा आहे कि या उत्तराच्या माध्यमातून शासनाची फसवणूक सिडकोच्या माध्यमातून करण्यात आली आहे. जवळपास सात ते आठ सोसायटी आहेत. टँकरने पाणी पुरवठा हे आपत्कालीन व्यवस्था असली पाहिजे मग त्या ठिकाणी दरवर्षी सोसायट्यांना ५० लाख, एक कोटी रुपयांचे पाणी विकत घ्यावे लागते हे पाणी सिडकोने द्यायला पाहिजे त्यामुळे याला जबाबदार कोण ?असा सवाल उपस्थित करून सिडकोच्या अनागोंदी कारभाराचे वाभाडेही त्यांनी काढले. दररोज पाणी लागते ते संध्याकाळी देऊन भागणार नाही. हेटवणे योजना दुरुस्ती काम सुरु आहे एमजेपी काम चालू आहे नवी मुंबई महानगरपालिका मनात येईल तेव्हा पाणी बंद करून टाकते अशा अनेक तक्रारी असूनसुद्धा सिडको याकडे अक्षरशः दुर्लक्षच करत असल्याचे त्यांनी आपल्या लक्षवेधीतून अधोरेखित केले. त्यामुळे पनवेल उरणला योग्यप्रकारे पाणी पुरवठा होण्यासाठी तातडीने उपाययोजना होणे गरजेचे नमूद करतानाच २०३० ला पाणी द्याल पण लोकांनी आज कसे जगायचे असा सवाल केला. तसेच अनेकवेळा पाणी पुरवठा नियमित व योग्य करण्यासाठी मागणी केली असल्याचे सभागृहाला सांगितले. त्यामुळे हे अधिवेशन संपण्यापूर्वी पनवेल व उरण तालुक्याचा पाणी पुरवठा स्टेम ऑथॉरिटीमार्फत करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्याची मागणी त्यांनी सभागृहात केली.

मंत्री माधुरी मिसाळ यांनी या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना सांगितले कि, पाताळगंगा ७९ एमएलडी, हेटवणे १९२ एमएलडी, मोरबे ५९ एम एल डी व इतर असे एकूण ३४२ एमएलडी पाणीपुरवठा सिडकोच्या माध्यमातून केला जातो आता सन २०२६ चे बघितले तर ३६५ एमएलडीची गरज आहे. खारघर, कामोठे, नवीन पनवेल, तलोजा या भागामध्ये साधारण पाण्याची तुट दिसून येते. सिडकोने ज्या काही योजना केल्या त्यामध्ये तात्काल पाणीपुरवठा, माध्यमिक योजना आणि लांब पल्ल्याच्या योजना अशा तीन प्रकारे सिडकोने नियोजन केले आहे. आता जी तात्काळ योजना आहे त्यामध्ये ३० एमएलडीची तूट आहे. मोरबे धरण एमजेपीला तयार करायला दिले होते त्यावेळी १०८ कोटी रुपये सिडकोने दिले होते. धरण झाल्यावर हे धरण नवी मुंबई महापालिकेला हस्तांतर करण्यात आले. नवी मुंबईकडून आपल्याला फक्त ५९ एमएलडी पाणीपुरवठा होतो. त्यामुळे २००७ पासून नवी मुंबई महापालिकेकडे मागणी केली की, १०८ कोटी रुपये शासनाकडे परत करावेत किंवा त्या पैशाच्या बदल्यात ९० एमएलडी पाण्याचा पुरवठा सिडकोला करावा. खरंतर नवी मुंबई महापालिका हा पुरवठा करू शकते या धरणातून ५१५ एमएलडी पाणी नवी मुंबईला मिळते त्या ठिकाणी आणि त्यांची गरज ४१५ एमएलडी आहे. त्या ठिकाणी १०० एमएलडी पाणी अतिरिक्त आहे त्यामुळे नवी मुंबईने हा प्रस्ताव मान्य केला तर ही तूट तात्काळ भरून निघू शकते. जेएनपीटी लाईनचे काम पूर्ण झाले तर १४ एमएलडी पाणी वळवू शकता येईल आणि हे दोन्ही तात्काळ मध्ये उपाय आहे. न्हावाशेवा टप्पा तीनचे काम साधारण डिसेंबर पर्यंत पूर्ण होईल आणि तेथून सिडकोला ६९ एमएलडीचा पाणीपुरवठा उपलब्ध होईल, असे मंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले. स्टेम सारखी ऑथॉरिटीची मागणी बरोबर आहे ती आपण पूर्ण करू त्यासाठी पॉलिसी डिसिजन घेण्याची गरज आहे. नवी मुंबई महापालिकेने सिडकोला पाणीपुरवठा करायला पाहिजे सिडकोने तसे वारंवार तसे निर्देश दिले आहेत पण नवी मुंबई महापालिका अद्याप पाणीपुरवठा करत नाही तोही निर्णय घेण्याची गरज या निमिताने आहे. पनवेल महापालिकेला सिडको पाणीपुरवठा करते आणि ते काम महापालिकेला हस्तांतरित करू शकतो का याचाही विचार केला जाईल असेही नामदार मिसाळ यांनी स्पष्ट केले. ऑटोमेशन सिस्टीम करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती. त्यानुसार सिडको तर्फे ९ सप्टेंबर २०२५ ला निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती पण त्या निविदेला प्रतिसाद मिळाला नाही त्यानंतर नवीन निविदा २४नोव्हेंबर २०२५ ला मागवली असून त्याचा कालावधी १८ मार्च २०२६ पर्यंत आहे त्याचबरोबर यासाठी फेब्रुवारी महिन्यात कन्सल्टंट ची नेमणूक करण्यात आली आहे त्यानुसार लवकरच ऑटोमेशन प्रणाली बसविण्यात येईल अशी ग्वाही मंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली. तसेच या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक आयोजित करण्याचे त्यांनी आश्वासित केले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर सिडकोच्या कारभारावर तीव्र टीका करत नागरिकांची होत असलेली गैरसोय अधोरेखित केली. शासनाकडून मिळालेल्या उत्तरावर आक्षेप नोंदवत त्यांनी सिडकोने शासनाची दिशाभूल केल्याचा आरोप केला. पनवेल व उरण परिसरात अनेक सोसायट्यांना दरवर्षी टँकरद्वारे लाखो रुपयांचे पाणी विकत घ्यावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले. २०५० पर्यंतच्या पाणी व्यवस्थापनाचा रोडमॅप सांगितला जात असताना सध्या २३ एमएलडी पाण्याची तूट असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे पाणीपुरवठा व्यवस्थेबाबत सिडकोच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या लक्षवेधी सूचनेवर बोलताना आमदार महेश बालदी यांनी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या कारभारावर तीव्र टीका केली. सभागृहात त्यांनी सांगितले की, सिडको नैना, एज्यु-सिटी आणि तिसरी मुंबई उभारण्याचा प्रयत्न करत आहे, त्याचे स्वागत आहे; मात्र आजपर्यंत पाणी वितरणाच्या ऑटोमेशनसंदर्भात टीसीएसने दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी सिडकोकडून का होत नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सिडकोमधील काही कर्मचारी टँकर माफिया चालवतात, असा जाहीर आरोपही त्यांनी केला. केवळ योजना जाहीर करून उपयोग नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले. तसेच सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक अस्तित्वात नसलेले प्लॉट विकण्याच्या मागे लागले आहेत, असा गंभीर आरोप करत सिडकोमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराची कीड लागल्याचा घणाघाती आरोप त्यांनी केला.

## नववर्ष स्वागत समिती आयोजित गुढीपाडवा शोभायात्रेची पनवेलमध्ये जय्यत तयारी सुरू

### युवानाद ट्रस्टतर्फे ध्वज-लेझीम-ढोल पथकात होणार १५० मुलं सहभागी




**दैनिक युवक आधार**

**पनवेल, ( वार्ताहर ) :** हिंदू नववर्षाचे जल्लोषात स्वागत करण्याकरिता चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडव्याच्या दिवस पनवेल शहरातून भव्य शोभायात्रा आयोजित केली जाते. दरवर्षीप्रमाणे यंदाही गुढीपाडव्याच्या दिवशी म्हणजेच गुरुवार, १९ मार्च २०२६ रोजी नववर्ष स्वागत समितीतर्फे शोभायात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे.पनवेल शहरातील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहातुन सदर शोभायात्रेची सुरुवात असून कर्मवीर भाऊराव पाटील चौक - टपाल नाका(शनी मंदिर) - महात्मा गांधी मार्ग - मिरची गल्ली - कापड बाजार - जय भारत नाका - लोकमान्य टिळक मार्ग यामार्गे फिरून स्वा. सावरकर चौक येथे समाप्त होणार आहे. यावेळी युवानाद ट्रस्टतर्फे ध्वज-लेझीम-ढोल पथकात होणार १५० मुलं सहभागी होणार असल्याने हे मुख्य आकर्षण ठरणार आहे .

## सावधान! उन्हाचा पारा चढतोय; वीज यंत्रणेजवळ कचरा जाळणे ठरू शकते जीवघेणे

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : विदर्भामध्ये उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असून, वाढत्या उष्णतेसोबतच आगीच्या घटनांमध्येही मोठी वाढ होत असल्याचे चित्र समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर, महावितरणने नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील नागरिकांना अत्यंत महत्त्वाचा सतर्कतेचा इशारा दिला आहे. वीज यंत्रणेच्या आसपास कचरा टाकणे किंवा तो जाळणे ही केवळ तांत्रिक चूक नसून, तो संपूर्ण समाजाच्या सुरक्षिततेशी खेळ आहे, असे स्पष्ट करत महावितरणने नागरिकांना जबाबदारीने वागण्याचे आवाहन केले आहे.

शहरी आणि ग्रामीण भागात अनेकदा वीजवाहिन्या, फिडर पिलर, रोहित्र (डीपी) किंवा वितरण पेट्यांजवळील मोकळ्या जागेचा वापर कचरा टाकण्यासाठी केला जातो. उन्हाळ्याच्या दिवसात ही वीज यंत्रणा आधीच प्रचंड तापलेली असते. अशा स्थितीत या कचऱ्याला आग लागल्यास किंवा तो मुद्दाम पेटवल्यास आगीच्या भीषण झळांमुळे भूमिगत केबल्स आणि महागडी उपकरणे पूर्णपणे जळून खाक होतात. यामुळे केवळ महावितरणचे आर्थिक नुकसान होत नाही, तर संबंधित संपूर्ण परिसराचा वीजपुरवठा तासनतास खंडित होतो. विशेषतः डोक्यावरून जाणाऱ्या उच्च दाबाच्या वीजवाहिन्याखालील कचरा पेटल्यास तारा वितळून खाली कोसळण्याची शक्यता असते, ज्यामुळे मोठी जीवितहानी होऊ शकते.




विद्युत सुरक्षा ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून ती एक सामाजिक बांधिलकी आहे. आपली एक छोटीशी चूक किंवा निष्काळजीपणा एखाद्या निष्पापाचा बळी घेऊ शकतो किंवा संपूर्ण वस्तीला अंधारात टाकू शकतो. कचरा व्यवस्थापनाचे नियम पाळून आपण आपली वीज यंत्रणा सुरक्षित ठेवू शकतो. नागरिकांनी स्वतः सतर्क राहून इतरांनाही वीज यंत्रणेजवळ आग लावण्यापासून रोखावे, हाच खरा सामाजिक सुरक्षेचा संदेश आहे.

बाहेरील यंत्रणेसोबतच घरगुती विद्युत उपकरणांची सुरक्षाही तितकीच महत्त्वाची आहे. उन्हाळ्यात एसी, कुलर आणि पंख्यांचा वापर वाढल्याने वायरिंगवर ताण येतो. नॅशनल इलेक्ट्रिक कोडनुसार घराच्या वायरिंगचे आयुष्य 20 ते 25 वर्षे असते. त्यामुळे जुन्या इमारतींमधील वायरिंगची शासनमान्य परवानाधारक कंत्राटदाराकडून तपासणी करून घेणे अनिवार्य आहे. वायरिंगमधील सैल जोडणी (Loose Connection), उंदरांनी कुरतडलेल्या वायर्स किंवा ओव्हरलोडिंगमुळे शॉर्ट सर्किट होऊन आग लागण्याचा धोका असतो.दुर्दैवाने आग लागल्यास घाबरून न जाता सर्वप्रथम घरातील 'मेन स्विच' बंद करावा. विद्युत आगीवर कधीही पाण्याचा वापर करू नका; त्याऐवजी कोरडी रेती किंवा कार्बन डायऑक्साइड (Fire Extinguisher) चा वापर करावा. आग लागल्याचे किंवा वीज यंत्रणेला धोका असल्याचे निदर्शनास आल्यास तत्काळ महावितरणच्या 24 तास कार्यरत असलेल्या 1912, 19120 किंवा 18002123435 / 18002333435 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.आपली सतर्कता आणि नियमांचे पालन हेच उन्हाळ्यातील आगीच्या संकटावर प्रभावी उत्तर आहे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

## विदर्भातील सिंधीविहिर आणि आमझरी या गावांची मधाचे गाव योजनेसाठी निवड

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे**
**दुस-या टप्प्यात नागपूर जिल्ह्यातील 'नरहर' होणार मधाचे गाव**

**दैनिक युवक आधार**

**राकेश यादव/वाडी नागपूर :** आदिवासी व ग्रामीण भागात मधमाशी पालनास चालना देणे, रोजगारनिर्मिती करणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे व पर्यटनाशी संलग्न शाश्वत विकास साधणे यासाठी मधाचे गाव या योजनेची निर्मिती करण्यात आली आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात सन २०२५-२६ या वर्षासाठी राज्यातील दहा गावांची निवड करण्यात आली आहे. यात विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील सिंधीविहिर आणि अमरावती जिल्ह्यातील आमझरी या गावांचा समावेश असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे यांनी आज येथे दिली.

रवी भवन येथे मधाचे गाव योजनेची तसेच मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नित्यानंद पाटील, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदीप चेचरे यावेळी उपस्थित होते.

श्री. साठे पुढे म्हणाले की, घोलवड (ता. डहाणू, जि. पालघर), भंडारवाडी (ता. किनवट, जि. नांदेड), बोरझर (ता. नवापूर, जि. नंदूरबार), काकडदाभा (ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली), चाकोरे (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक), उडदावणे (ता. अकोले, जि. अहिल्यानगर), शेलमोहा (ता. गंगाखेड, जि. परभणी), सिंधीविहिर (ता. कारंजा, जि. वर्धा), साळोशी (ता. महाबळेश्वर, जि. सातारा) व आमझरी (जि. अमरावती) या दहा गावांची निवड या योजनेसाठी करण्यात आली आहे. या गावांसाठी ५ कोटी १ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात सात गावांमध्ये सातेरी मधमाशी पालन व तीन गावांमध्ये 'बी हंटर्स'च्या माध्यमातून मध व मेण संकलनासाठी एकूण ३४८ मधपाळांची निवड करून त्यांना दहा दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राज्यात मधाचे गाव योजना राबविण्यात येत आहे. नैसर्गीक साधन संपती व मुबलक फुलोरा असणा-या भागात मधमाशा संवर्धनातुन निसर्गाचे सरंक्षण होण्याच्या दृष्टीने तसेच मधमाशांचे संवर्धन व संरक्षण तसेच मध आणि मधमाशापासुन तयार होणारी उत्पादने यांची साखळी प्रक्रिया व विक्री व्यवस्था करणे, या माध्यमातुन मधुपर्यटन आणि विविध शासकीय विभागाचा समन्वय साधुन मधाचे गांव स्वयंपुर्ण बनविणेचे उद्देशाने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राज्यात मधाचे गाव योजना राबविण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

मधाचे गाव योजनेंतर्गत या लाभार्थ्यांना १ हजार ६५० मधपेट्या, १२८ संरक्षक पोशाख, २५ किट तसेच अन्य आवश्यक साहित्य ९० टक्के शासकीय अनुदान व १० टक्के लाभार्थी स्वगुंतवणुकीच्या तत्वावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. योजनेंतर्गत मधुबनाची स्थापना, सामूहिक सुविधा केंद्र, मध प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट, हनी माहिती व जनजागृती केंद्र, हनी थीम आधारित सेल्फी पॉईट व मधुबनाची निर्मिती, मधमाशी व पर्यावरण विषयक सौदर्याकरण व थीम डेव्हलपमेंट इत्यादी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे शेतकरी व ग्रामीण युवकांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन उपलब्ध होण्याबरोबरच विदर्भातील शुद्ध व दर्जेदार मधाला बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे श्री. साठे यांनी यावेळी सांगितले.

विदर्भातील ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती वाढविणे व पारंपरिक उद्योगांना चालना देण्याच्या उददेशाने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून आगामी काळात काही महत्वपूर्ण विकासात्मक उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

**जिल्ह्यातील नरहर होणार मधाचे गाव**

नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातील नरहर या गावाची विविध निकषांच्या पूर्ततेच्या आधारावर मधाचे गाव या योजनेसाठी निवड करण्यात आली आहे. मधाचे गाव या योजनेच्या पुढील टप्प्यात या गावाचा समावेश करण्यात येणार असल्याची माहितीही श्री. साठे यांनी यावेळी दिली.

## शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन तसेच महारोजगार मेळाव्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, ( वार्ताहर ) :** दिनेश मांडवकर आणि श्री.विश्वास पाटील यांच्या माध्यमातून श्री.विद्याधर चोरघे यांच्या जन्मदिनाचं औचित्य साधत केले महारोजगार मेळाव्याचे आयोजन आणि शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले . सामाजिक बांधिलकीचे संस्कार आपल्या मुळ स्वभावातच जपणारे आणि समाजाप्रति असणारे उत्तरदायित्व आपल्या प्रत्येक कृतीतून दाखवून देणारे सामाजिक आणि राजकीय पटलावरचं एक उभरतं उमदा युवा नेतृत्व शिवसेना पनवेल-नेरे विभाग प्रमुख विद्याधर चोरघे यांच्या जन्मदिनाचं औचित्य साधत शिवसेना पनवेल तालुका संघटक दिनेश मांडवकर आणि शिवसेना पनवेल उप तालुकाप्रमुख व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य विश्वास पाटील यांच्या माध्यमातून एक आदर्शवत असं कार्य साकारलं ते म्हणजे प्युअर अ‍ॅण्ड शुअर अग्रो पॅकेजिंग प्रा.लि.( कॅम्पा कोला ) तळोजा एम.आय.डी.सी. या कंपनीच्या वतीने भव्य अश्या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. रोजगार निर्मितीच्या अनेक नवीन संधी निर्माण करणाऱ्या ह्या कंपनीच्या माध्यमातून आयोजित महारोजगार मेळाव्याला पनवेल नेरे विभागातील आणि आजूबाजूच्या परिसरातील उच्च शैक्षणिक गुणवत्ता प्रदाण असणाऱ्या अनेक बेरोजगार युवक, युवतींनी,आय.टी.आय. ,फिटर, इलेक्ट्रिशियन, प्लांट मशिन्स ऑपरेटर ,लॅब असिस्टंट ह्या पदांवर काम करण्याची संधी उपलब्ध करून देणाऱ्या ह्या कंपनीच्या माध्यमातून मिळणाऱ्या नोकऱ्यांच्या संधींचा फायदा घेण्यासाठी आपला सहभाग नोंदवत आपल्या मुलाखती देत अनेक युवक, युवतींनी ह्या सुवर्ण संधीचा फायदा घेतला. सोबतच सामाजिक कार्याच्या माध्यामातून राजकीय पटलावर आपल्या कार्याचा ठसा उमटवून जनमाणसांत आपल्या हक्काचा माणूस म्हणून नावारूपाला आलेलं आणि नेतृत्व गुण असणारं राजकीय पटलावरचं डॅशिंग युवा नेतृत्वांचा त्रिवेणी संगम असणारी व्यक्तिमत्त्व अर्थात दिनेश मांडवकर, विश्वास पाटील आणि विद्याधर चोरघे त्यांच्या सोबत असणाऱ्या शिवसेनेतील त्यांच्या राजकीय सहकारी कार्यकर्ते,पदाधिकाऱ्यांच्या कार्याचा झंझावात असाच पुढे सुरू रहावा आणि त्यातूनच ह्या विभागातील जनतेसोबत जनसंवाद वाढावा आणि सोबतच आपल्या विभागातील जनतेला भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करता यावं या करिता आपल्या हक्काचं ठिकाण असावं म्हणून नेरे येथे शिवसेना जनसंपर्क कार्यालय नेरे ( विधानसभा ग्रामीण कार्यालयाचा ) उद्घाटन सोहळा समारंभ देखील मोठ्या उत्साहात संपन्न झाला. विद्याधर चोरघे यांच्या जन्मदिनाचं औचित्य साधत साकारलेल्या ह्या आदर्शवत अश्या कार्यक्रमा करिता सामाजिक राजकिय कला क्रिडा आणि विविध क्षेत्रातील दिग्गज अश्या व्यक्तिमत्त्वांची विशेष अशी उपस्थिती लाभली होती. महारोजगार मेळावा आणि शिवसेना जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन सोहळा कार्यक्रमात करिता प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थिती लाभली ती प्युअर अ‍ॅण्ड शुअर अ‍ॅग्रो पॅकेजिंग प्रा.लि.चे प्लांट मॅनेजर चेतन भुराळे , कॉलिटी कंट्रोल मॅनेजर शिरीष जोशी पनवेल महानगरपालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक आणि शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे , दुंदरे ग्रुप ग्रामपंचायतीचे कर्तव्यदक्ष सरपंच सुभाष भोपी , माजी सरपंच भारत भोपी, बाबा बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्सचे मालक धनंजय पाटील ,शिवसेना पनवेल तालुका संघटक दिनेश मांडवकर शिवसेना पनवेल उपतालुका प्रमुख व दुंदरे ग्रुप ग्रामपंचायतीचे विद्यमान ग्रामपंचायत सदस्य विश्वास पाटील , शिवसेना पनवेल उपतालुका प्रमुख कैलास माळी , बाळा चोरघे नेरे ग्रामपंचायतच्या माजी उपसरपंच.सुप्रिया दिनेश मांडवकर. विनया विद्याधर चोरघे काही महिला व पुरुष आदी उपस्थित.यांच्या सोबतच विद्याधर चोरघे यांना जन्मदिनानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी त्यांचा मित्र परिवार आणि विविध क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर मंडळींनी आपली उपस्थिती दर्शवत हा आदर्शवत असा सोहळा मोठ्या उत्साहात आणि धुमधडाक्यात संपन्न झाला.



# सणसरमध्ये रमजान सण साधेपणाने स्व .अजितदादा पवारांना भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**सणसर/ विकास क्षत्रिय** : राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते स्व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अकस्मात निधनामुळे सणसर (ता.इंदापूर,जि.पुणे) येथील मुस्लिम समाजाने पवित्र रमजान महिन्याचा सण एकदम साध्या पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.मुस्लिम समाजासाठी स्व.अजितदादा पवार यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेऊन त्यांची विकासकामे केली असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.जामा मशीद सणसर येथे रविवारी झालेल्या नमाज पठणानंतर गावातील सर्व मुस्लिम समाजाने एकत्रितपणे हा निर्णय घेतला असून रमजानच्या उत्सवात कोणताही धुमधडाका न करता,साधेपणाने धार्मिक विधी पार पाडले जातील. यामागील उद्देश म्हणजे स्व.अजितदादा पवार यांच्या स्मृतीला भावपूर्ण आदरांजली वाहणे हा आहे. सणसर गावातील मुस्लिम समाजबांधवांनी या निर्णयाचे स्वागत केले असून श्रद्धांजली सभेत गावकऱ्यांनी त्यांच्या कार्याचा उल्लेख करून शोक व्यक्त केला जाणार आहे मुस्लिम समाजाने दाखविलेली ही संवेदनशीलता समाजातील ऐक्य आणि परस्पर आदराचे प्रतीक ठरणार आहे.यावेळी माजी चेअरमन शब्बीरभाई काझी, माजी ग्रामपंचायत सदस्य अजीजभाई तांबोळी, इकबाल काझी, उमरभाई सय्यद, मुबारक कासम सय्यद, बबनभाई सय्यद, हानीफ तांबोळी, जावेद सय्यद,अलीम सय्यद,गुलाबभाई सय्यद, वसीमभाई सय्यद, इनूस सय्यद,जैनुदिन कबीर, मुस्तफा सय्यद आदी मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# वावोशी फाटा येथे परवानगीविना गॅस वाहिनीचे खोदकाम? ग्रामस्थांचा तीव्र आक्षेप

**दैनिक युवक आधार**

**खालापूर/संतोष शेवाळे :** गोरठण बुद्रुक ग्रामपंचायत हद्दीतील वावोशी फाटा परिसरात गॅस वाहिनी टाकण्याचे काम सुरू असून,या कामासाठी ग्रामपंचायतीची लेखी परवानगी घेतलेली नसल्याचा गंभीर आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे.घरांच्या अगदी लगत,अवघ्या दोन फूट अंतरावर खोदकाम सुरू असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे व चिंतेचे वातावरण पसरले आहे.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार,संबंधित कंपनीकडून किंव्हा महसूल विभागाकडून कोणतीही पूर्वसूचना




देण्यात आलेली नाही. तसेच घरमालकांची लेखी संमतीही घेण्यात आलेली नसल्याचा दावा करण्यात येत आहे."घराच्या पायाभरणीजवळून गॅस वाहिनी टाकणे धोकादायक ठरू शकते. भविष्यात गॅस गळती किंवा तांत्रिक बिघाड झाल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही,"अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी दिली.

ग्रामपंचायत हद्दीत कोणतेही सार्वजनिक काम,विशेषतः खोदकाम, करण्यापूर्वी ग्रामपंचायतीची अधिकृत परवानगी घेणे आवश्यक असते. मात्र सदर प्रकरणात अशी परवानगी घेतली नसल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने तात्काळ हस्तक्षेप करून काम थांबवावे व सखोल चौकशी करावी,अशी मागणी होत आहे.

याबाबत शिरवली गावचे माजी उपसरपंच सदानंद मोरे पोलीस प्रशासन तसेच तहसील कार्यालयाकडे लेखी तक्रार देऊन आले असून .गरज भासल्यास अलिबाग एस पी कडेही धाव घेण्यात येईल,असा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान,संबंधित गॅस वितरण कंपनीकडून अद्याप अधिकृत स्पष्टीकरण मिळालेले नाही. जर काम नियमांनुसार व आवश्यक परवानग्यांसह सुरू असेल, तर त्याबाबतची कागदपत्रे सार्वजनिक करावीत,अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.या घटनेमुळे रायगड डिस्ट्रिक्ट प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत नियमबाह्य कामांवर कठोर कारवाई व्हावी,अशी सर्वसामान्यांची अपेक्षा व्यक्त होत आहे.



**पिलीव प्रतिनिधी:-श्री क्षेत्र अक्कलकोट येथील ब्रम्हांडनायक सद्गुरु श्री स्वामी समर्थ अक्कलकोट येथील पादुका पंढरपूर मार्गे येत असताना पिलीव या ठिकाणी श्री रघुनाथ गणपत देवकर यांचे घरी पादुकांचे आगमन झाले. यावेळी श्री व सौ रघुनाथ देवकर, श्री व सौ प्रकाश अनिल जाधव, श्री व सौ विकास देवकर यांना ब्रम्हांडनायक सद्गुरु श्री स्वामी समर्थ यांचे पादुकांचे पूजन करण्याचे भाग्य लाभले. अक्कलकोट येथील पादुकांसमवेत आलेल्या काकांनी धार्मिक विधी केला. यावेळी "आमचे परिवाराला ब्रह्मांडनायक सद्गुरु श्री स्वामी समर्थ यांच्या पादुकांना चरणस्पर्श करून पूजन करण्याचे भाग्य आम्हाला लाभल्याचा खूप मोठा आनंद झाला आहे धन्य धन्य ते स्वामी समर्थ". अशा प्रकारच्या प्रतिक्रिया देवकर व जाधव परिवाराने दिल्या. यावेळी असंख्य स्वामीभक्त दर्शनासाठी उपस्थित होते.**

**( दैनिक युवक आधार )**

# कृष्णा मोटर्स LCV चा पहिला वर्धापन दिन उत्साहात साजरा

## मुंबई एमएमआरमध्ये 500+ वाहन विक्रीचा टप्पा पार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** Krishna Motors LCV या Ashok Leyland च्या अधिकृत विक्री व सेवा केंद्राने आपल्या स्थापनेचा पहिला वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. गेल्या एका वर्षात कंपनीने उल्लेखनीय प्रगती करत ग्राहकांचा विश्वास संपादन केला असून मुंबई महानगर प्रदेशात आपला विस्तारही वाढवला आहे.

2025 मध्ये स्थापना झालेल्या या कंपनीचे मुख्यालय पनवेल येथे असून दहिसर, कल्याण, चिपळूण, वडखळ आणि माणगाव येथे शाखा कार्यरत आहेत. श्रीकृष्ण वाघे, मयूर वाघे आणि सौरभ वाघे यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

अत्यंत कमी कालावधीत कृष्णा मोटर्स LCV ने मुंबई एमएमआर क्षेत्रात 500 हून अधिक वाहनांची विक्री करून महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या यशाच्या निमित्ताने विशेष पूजा आणि वार्षिक समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान 11 वाहनांचे वितरण करण्यात आले तसेच प्रत्येक ग्राहकाला आभाराची खूण म्हणून टीव्ही भेट देण्यात आला.

यावेळी कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे आणि भागीदारांचे मोलाचे योगदान लक्षात घेऊन त्यांचा सन्मान करण्यासाठी पुरस्कार वितरण सोहळाही आयोजित करण्यात आला.




सुरुवातीला केवळ 30 कर्मचाऱ्यांसह सुरू झालेल्या या संस्थेने आज 100 पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांचा टप्पा गाठला असून कंपनीच्या सातत्यपूर्ण वाढीचे आणि उत्कृष्टतेच्या ध्यासाचे हे प्रतीक आहे.

कृष्णा मोटर्स LCV ही Ashok Leyland ची सर्वोत्तम डीलरशिप बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असून ग्राहक समाधान, उत्कृष्ट सेवा आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर आगामी काळात आणखी मोठे यश मिळवण्याचा कंपनीचा विश्वास आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क :

कृष्णा मोटर्स LCV, मुख्य कार्यालय – पनवेल

सेल्स: +91 9076190099

सर्व्हिस: +91 9167630099

ई-मेल: info@krishnamotorsal.com

वेबसाईट: https://krishnamotorsal.com

# रायगड प्रेस क्लबच्या पुरस्कारांची घोषणा ; ८ एप्रिलला पनवेलमध्ये होणार भव्य गौरव सोहळा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रायगड प्रेस क्लबची महत्त्वपूर्ण जिल्हा कार्यकारिणी सभा नुकताच पनवेल येथे संपन्न झाली. या सभेत रायगड प्रेस क्लबच्या वतीने देण्यात येणाऱ्या २०२६ सालच्या विविध प्रतिष्ठित पत्रकारिता पुरस्कारांची रायगड प्रेस क्लबच्या वतीने अधिकृत घोषणा करण्यात आली असून विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत ८ एप्रिल रोजी पनवेल येथे वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात हा भव्य गौरव सोहळा पार पडणार आहे.सदर सभा रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, कोकण विभागीय सचिव मनोज खांबे, माजी अध्यक्ष विजय मोकल, अनिल भोळे, कार्याध्यक्ष संजय मोहिते, सरचिटणीस दर्वेश पालकर, उपाध्यक्ष मोहन जाधव, मुख्य संघटक शशिकांत मोरे, महिला संघटिका सीमा मोरे, संघटक दिनेश सुतार, विभागीय सचिव शिवराज पार्टे, जनसंपर्क अधिकारी कमलेश ठाकूर, पनवेल महानगर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांच्यासह जिल्हाभरातील पदाधिकारी, तालुका अध्यक्ष व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जाहीर झालेले पुरस्कार व मानकरी:**

- आचार्य अत्रे राज्यस्तरीय संपादक सन्मान: कमलेश सुतार (संपादक, झी २४ तास)
- रायगड प्रेस क्लब जीवन गौरव सन्मान: उमाजी केळुस्कर (अलिबाग)
- निशिकांत जोशी स्मृती पत्रकार सन्मान: नरेश पवार (पेण)
- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला पत्रकार सन्मान: श्रीमती तृप्ती पालकर (पनवेल)
- दीपक शिंदे स्मृती व्हिडिओ जर्नालिस्ट सन्मान: स्वप्नील दुधारे (पनवेल)
- प्रकाश काटदरे स्मृती निर्भीड पत्रकार सन्मान: रवींद्रनाथ ओव्हाळ (पाली)
- संतोष पवार स्मृती युवा पत्रकार सन्मान: शिवराज पार्टे (पोलादपूर)
- ॲड. जनार्दन पाटील स्मृती शोध पत्रकार सन्मान: विद्यानंद ओव्हाळ (कर्जत)
- डॉ. सचिन पाटील स्मृती पत्रकारिता सन्मान: शशिकांत मोरे (रोहा)
- प्रेस क्लब ॲक्टिव्ह जर्नालिस्ट सन्मान: चंद्रहास नगरकर (महाड) व अमूलकुमार जैन (मुरुड)
- रायगड प्रेस क्लब विशेष सन्मान: अजय कदम (माथेरान) व रवींद्र मोरे (खोपोली)
- रायगड प्रेस क्लब सामाजिक कार्यकर्ता सन्मान: सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था (कोलाड) व हेल्प फाउंडेशन (खोपोली)
- रायगड जिल्हा श्रमिक पत्रकारिता सन्मान: हरेश साठे (पनवेल) व विश्वजीत लुमन (रोहा)

**८ एप्रिल रोजी वर्धापन दिन सोहळा**

रायगड प्रेस क्लबचा २१ वा वर्धापन दिन आणि पत्रकार सन्मान सोहळा बुधवार, ८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे संयोजन 'पनवेल महानगर प्रेस क्लब' करणार आहे.

# वृद्ध कलावंत यांनी मानधन मंजूर करण्यासाठी कुणालाही पैसे देण्याची गरज नाही –जिल्हाध्यक्ष श्रीकांत नागदेवे

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा-** वृद्ध कलावंत यांनी मानधन मंजूर करण्याकरिता कोणालाही पैसे देऊ नयेत आणि मानधन समिती मधील सदस्य पैशाची मागणी करीत असतील तर त्यांची लेखी तक्रार संघटनेकडे करण्याचे आवाहन

भारतीय लोक कलाकार सांस्कृतिक संघटनेचे भंडारा जिल्हाध्यक्ष श्रीकांत नागदेवे यांनी एका पत्रकातून केलेली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, ज्या वृद्ध



कलावंतांनी मानधनासाठी अर्ज केले त्यांनी समितीमधील सदस्यांना पैसे देण्याची गरज नाही. कारण आपले अर्ज मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जे कागदपत्र पुरावे आपण दिले ते तपासण्याकरिता जिल्हा परिषद सभागृह येथे प्रत्यक्ष मुलाखती करिता आपणास मुख्य कार्यपालन अधिकारी बोलावून आपण दिलेल्या कागदपत्राची तपासणी करणार आहेत. आणि जिल्हाधिकारी पात्र लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करून सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई यांच्याकडे मानधन मंजुरी करिता पाठवण्यात येतील. मानधन समितीमधील सदस्य कुणीही कलावंत नाही. त्यांना कुठल्याही कलेचा गंध नाही.फक्त आमदार ,खासदार यांच्या मर्जीतील नामधारी आहेत . कलावंतांचे मानधन मंजूर करणे जिल्हाधिकारी ,मुख्य कार्यपालन अधिकारी यांच्या अधिकार क्षेत्रात आहेत. त्याच प्रमाणे सांस्कृतिक विभाग संचालनालय नागपूर विभाग हे आहेत . कलावंतांनी बोगस कलावंत जिल्ह्यात मानधन घेत आहेत. त्याकरिता आता सर्व अधिकार जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सांस्कृतिक संचालनालय अधिकारी नागपूर विभाग यांच्याकडे अधिकार देण्यात आलेले आहेत याची नोंद सर्व ऑनलाईन मानधन कलावंत अर्जदारांनी घ्यावी .तसेच वृद्ध कलाकार मानधन समितीच्या सदस्यांनी कुणालाही पैशाची मागणी केली असेल तर तशी लेखी तक्रार कलावंतांनी संघटनेकडे द्यावी जेणेकरून अशा भ्रष्टाचारी सदस्यांवर संघटनेच्या माध्यमातून उचित कारवाई करता येईल असे आव्हान भारतीय लोक कलाकार सांस्कृतिक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष श्रीकांत नागदेवी यांनी केलेली आहे.

# 19 लाख 20 हजार रुपयांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** डिफेन्स मधून बोलत असून तुमच्या नावावर सहा आधार कार्ड दिसत आहेत आणि त्यावर चारशे कोटींचा फ्रॉड झालेला दिसत आहे, यातून बाहेर निघण्यासाठी पैसे पाठवा असे सांगून 19 लाख 20 हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात 12 मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

रंजना देवपूरकर या सेक्टर 34, खारघर येथे राहत असून त्यांना जयस्वाल नामक ईसमाने व्हाट्सअपवर कॉल करून तो डिफेन्समधून बोलत असल्याचे सांगितले आणि तुमच्या नावावर सहा आधार कार्ड दिसत आहे. त्यावर चारशे कोटींचा फ्रॉड झालेला दिसत आहे आणि ते तुमच्या नावावर घेतले असल्याचे सांगितले. हा प्रकार नाशिकमधील असून जयस्वाल यांनी त्यांना वारंवार व्हिडिओ कॉल, व्हाट्सअप कॉल केले. घरात कोणाला सांगितले तर तुमच्या मुलीला अटक करू असे सांगून व्हिडिओ कॉल केले आणि पोलिसाच्या ड्रेसमध्ये पाच ते सहा जण बसलेले दिसत होते.

त्यानंतर त्यांनी सांगितलेल्या खात्यामध्ये तेरा लाख वीस हजार रुपये पाठवले. यावेळी दोन दिवसांनी आम्ही दोघांना पकडले आहे असे समोरील इसमाने सांगितले. आणखी काही लोक पकडायचे आहे त्यासाठी सहा लाख रुपये आणखी पाठवले. यांनी आणखी पैशांची मागणी केली यावेळी त्यांनी सगळा प्रकार मुलीला सांगितला. हे सर्व खोटे असून ते फसवत आहेत असे मुलीने सांगितल्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली.

# फिरता ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यासाठी सेलू तालुक्यातील गावाकडून येणाऱ्या भाविकांसाठी जेवण देण्यात आले




**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/विठ्ठल काळे (सेलू)** : सेलू येथील अलंकापुरी मयुरी पार्क परिसरात फिरता ज्ञानेश्वरी पारायण सोहळा भव्यदिव्य उत्साहात पार पडत असून आजच्या पाचव्या दिवसाची सेवा मोरेगाव ग्रामस्था कडून सात क्विंटल पालक पुरी,तीन ट्रॅक्टर भरून पाठवण्यात आले.या सप्ताहात गावकऱ्यांना सेवेची संधी मिळाली आहे.या भव्यदिव्य सोहळ्यासाठी सर्व स्तरातून नागरिक, महिला व सर्व सामान्य माणसांचा उत्कृष्ट असा प्रतिसाद मिळत आहे.हा सोहळा दिमागदारपणे पार पडावा यासाठी सहा तालुक्यातील सर्व सेवेकरी अहोरात्र या सोहळ्यासाठी झटत असल्याचे दिसत आहे.या सोहळ्यास जनतेतूनही उदंड असा प्रतिसाद मिळत असून,हा सोहळा नयनदिप होण्यासाठी सेलू नगरी सज्ज असून आजूबाजूच्या व परिसरातील सर्व नागरिक , वारकरी या सोहळ्यासाठी प्रयत्न करत आहेत,हा सोहळा प्लॅस्टिक मुक्त,कॅशलेस मुक्त, पर्यावरण मुक्त, असून या सोहळ्याला सर्व स्थरातील विशेष अतिथी गणांचे सकाळी व संध्याकाळी हरी किर्तन होत आहे .या सोहळ्यासाठी विशेष गुरुजनांचे आशीर्वाद मिळत आहेत.हा सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रत्येक गावातील नागरिक सहकार्य करीत आहे.

# जगाला युद्ध नको, बुद्ध हवा : मानवतेसाठी शांततेचा संदेश

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जगाने मानवी इतिहासातील सर्वात भीषण घटना अनुभवली. ६ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने जपानमधील हिरोशिमा आणि ९ ऑगस्ट रोजी नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकला. या हल्ल्यामुळे हजारो लोक तात्काळ मृत्यूमुखी पडले, तर लाखो लोक जखमी झाले. संपूर्ण शहरे उद्ध्वस्त झाली आणि जपानवर मोठा मानवी व आर्थिक आघात झाला. या विनाशानंतर संपूर्ण जगाने युद्धाच्या भीषण परिणामांचा जवळून अनुभव घेतला.

या भयंकर घटनेनंतर शांतता, संयम आणि मानवतेचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरला. भगवान गौतम बुद्धांनी दिलेला संदेश आजही जगाला मार्गदर्शक ठरत आहे. बुद्धांच्या शिकवणीतून मानवाला अहिंसा, करुणा आणि शांततेचा मार्ग स्वीकारण्याची प्रेरणा मिळते. बुद्धांनी सांगितलेले पाली भाषेतील वचन




आजही अत्यंत अर्थपूर्ण मानले जाते –

**"सब्ब पापस्स अकरणं, कुसलस्स उपसंपदा।**

**सचित्तपरियोदपनं, एतं बुद्धान सासनं।"**

या वचनाचा अर्थ असा की, वाईट कर्म टाळणे, चांगले कर्म करणे आणि मन शुद्ध ठेवणे हा बुद्धांचा खरा उपदेश आहे. बुद्धांनी मानवाला द्वेष, हिंसा आणि सूडभावना टाळून शांततेच्या मार्गाने जगण्याचा संदेश दिला.

इतिहासात अनेकदा युद्धांमुळे मोठ्या प्रमाणावर मानवी जीवितहानी आणि विनाश झाला आहे. तथागत गौतम बुद्धांनीही आपल्या काळात शाक्य आणि कोलिय या दोन राज्यांमध्ये होऊ घातलेले युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यांनी सांगितले की, युद्धाने कोणताही प्रश्न सुटत नाही. उलट युद्धामुळे नवीन संघर्षांची बीजे पेरली जातात. जो दुसऱ्याला मारतो, त्याला मारणारा दुसरा भेटतो; जो दुसऱ्याला जिंकतो, त्याला जिंकणारा दुसरा निर्माण होतो. त्यामुळे समस्या संवाद आणि सामोपचाराने सोडवणे हाच खरा मार्ग आहे, असा संदेश त्यांनी दिला.

आजच्या आधुनिक युगातही जगातील अनेक देशांमध्ये तणाव, संघर्ष आणि युद्धाची परिस्थिती निर्माण होताना दिसते. अशा परिस्थितीत बुद्धांचा शांततेचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. मानवतेचे रक्षण करण्यासाठी आणि जगात कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी अहिंसा, सहिष्णुता आणि करुणा या मूल्यांची आवश्यकता आहे.

भारत ही भगवान बुद्धांची पावन भूमी आहे. या भूमीतून जगाला शांतता, समता आणि बंधुत्वाचा संदेश मिळाला. सम्राट अशोक, भगवान महावीर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान व्यक्तींनीही मानवतेच्या कल्याणासाठी कार्य केले. त्यांच्या विचारांनी समाजाला समता, न्याय आणि शांततेचा मार्ग दाखवला.आज जगात वाढत चाललेल्या संघर्षांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा बुद्धांचा संदेश स्मरणात ठेवण्याची गरज आहे. मानवजातीच्या भविष्यासाठी आणि पृथ्वीवरील शांततेसाठी एकच संदेश महत्त्वाचा ठरतो

**लेखक:-प्रा. प्रकाश गवारे**

# नऊ लाख 87 हजार रुपयांचे बनावट साहित्य प्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** 9 लाख 87 हजार 523 रुपयांचे विविध कंपन्यांचे बनावट साहित्य ताब्यात बाळगून साठेबाजी केल्याप्रकरणी राजेश रघु चाम्रिया (राहणार नौपाडा, कामोठे, भगत चाळ) यांच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात 13 मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

कामोठे पोलीस ठाणे हद्दीत नौपाडा गाव या ठिकाणी ईआयपीआर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या विविध कंपनीच्या लोगो आणि ट्रेडमार्क चिन्हाचा वापर करून बनावट उत्पादने साठा करून विक्रीसाठी ठेवले असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार कंपनीचे अधिकारी आणि पोलीस नौपाडा येथे गेले. राजेश चामरिया याने गोडाऊन उघडले असता त्या ठिकाणी नऊ लाख 87 हजार 523 रुपयांचे विविध कंपन्यांचा बनावट माल सापडून आला.

# विकास मराठी शाळा समूहाच्या माजी विद्यार्थी, पालक, शिक्षक व संस्थेच्या सक्रिय सहभागातून गुणवत्तापूर्ण आनंददायी कृतीयुक्त शिक्षणाचा प्रयोग ‘ सहप्रवास 2026

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/ प्रतिनिधी :** विद्या विकास एज्युकेशन सोसायटी संचालित विकास हायस्कूल मराठी शिशु विभाग, मराठी प्राथमिक व माध्यमिक विभाग (सेमी-इंग्रजी माध्यम) यांच्या संयुक्त विद्यमाने ‘सहप्रवास २०२६’ या मराठी भाषा व माध्यमाच्या संवर्धनासाठी आयोजित कार्यक्रमाचे सादरीकरण शालेय सभागृहात शेकडो पालकांसमोर करण्यात नुकतेच करण्यात आले. विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचा स्नेहमेळावा, सहप्रवास असणाऱ्या या कार्यक्रमात संस्थेच्या विश्वस्त श्रीम. माधवी नांदोसकर यांच्या हस्ते शाळेसाठी १ स्मार्ट बोर्ड व लोकसहभागातून विद्यार्थ्यांसाठी ४० बेंच मिळाले त्यांचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थी व पालक यांच्या संयुक्त विद्यमाने “माझी मराठी शाळा” या शीर्षकांतर्गत विविध शैक्षणिक कार्यक्रम सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला पालकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.सदर कार्यक्रम मराठी शाळेची महती सांगणारा, पालक- विद्यार्थी-शिक्षक




यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ करणारा त्यांना प्रेरणा देणारा ठरला. जुन्या आठवणींना उजाळा देणारा हा स्नेहमेळावा व सहप्रवास सर्वांच्या मनात स्मरणीय ठरला. त्याचप्रमाणे जवळजवळ ३० ते ३५ माजी विद्यार्थी, २५० पालक, विद्यार्थी सर्व विभागातील मुख्याध्यापक,शिक्षकवृंद सर्व पालक प्रतिनिधी, शालेय व्यवस्थापन सदस्य उपस्थित होते.

विद्या विकास संस्थेचे आदर्श शिक्षक म्हणून राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त संस्थापक गुरूवर्य स्व. प. म. राऊत व माजी सीईओ स्व. सौ. विद्या प. राऊत यांच्या प्रेरणेतून शाळा गुणवत्तापूर्ण प्रयोगशील शिक्षणासाठी आजही कार्यरत आहेत. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानातर्गत विद्या विकास प्राथमिक शाळा वांगणी, विकास हायस्कूल माध्यमिक व विकास हायस्कूल इंग्रजी प्राथमिक विभागाला विभागनिहाय प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.

विकास हायस्कूल मराठी व इंग्रजी प्राथमिक विभाग शाळांना SQAAF अंतर्गत A+ श्रेणी व स्वच्छ हरित विद्यालय मूल्यांकनात 5 स्टार रेटिंग मिळाले आहे . नवीन शैक्षणिक धोरणानुसार सर्व शिक्षक तंत्रस्नेही होऊन अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये शिक्षक त्याचा वापर करत आहेत शाळा आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रेरणादायी केंद्र ठरत आहे. शिक्षण, संगीत, क्रीडा, नृत्य, योग, संरक्षणासाठी कराटे, इंग्रजी भाषा संभाषण वर्ग, पोषण आहार, संगणक, AI रोबॉटिक्स व इनोवेशन लैब या सुविधा व सेमि इंग्रजी असलेल्या या मराठी शाळा उपनगरातील विद्यार्थीप्रिय शाळा ठरल्या आहेत.

# पुणे – सावंतवाडी दरम्यान ‘अमृत भारत एक्सप्रेस’ सुरू करण्याबाबत रेल्वेमंत्र्यांशी चर्चा

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर,मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : पुणे ते कोकण दरम्यान रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी नवीन ‘अमृत भारत एक्सप्रेस’ सेवा सुरू करण्याबाबत तसेच सावंतवाडी रेल्वे टर्मिनस प्रोजेक्ट उभारणीसंदर्भात पुण्याच्या राज्यसभा खासदार मेधा ताई कुलकर्णी यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. ही भेट नवी दिल्ली येथे पार पडली.

या भेटीत पुणे ते सावंतवाडी दरम्यान थेट अमृत भारत एक्सप्रेस सेवा सुरू केल्यास कोकण आणि पुणे परिसरातील हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल, असे खासदार मेधा कुलकर्णी यांनी रेल्वेमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.



सध्या पुणे व कोकण दरम्यान थेट रेल्वे सेवांची मर्यादित उपलब्धता असल्यामुळे प्रवाशांना अनेकदा बदल करून प्रवास करावा लागतो. त्यामुळे नवीन गाडी सुरू झाल्यास विद्यार्थ्यांपासून व्यावसायिक, पर्यटक आणि स्थानिक प्रवाशांना मोठी सोय होणार आहे.

याचबरोबर ‘प्रधानमंत्री गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लॅन’ अंतर्गत सावंतवाडी येथे आधुनिक रेल्वे टर्मिनस उभारण्याची मागणीही करण्यात आली. सावंतवाडी हे कोकणातील महत्त्वाचे पर्यटन व व्यापारी केंद्र असल्याने येथे टर्मिनस उभारल्यास कोकणातील रेल्वे वाहतूक अधिक सक्षम होईल, तसेच पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

दरम्यान, या मागणीसाठी कोकण रेल्वे प्रवासी संघटना, सावंतवाडी यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. संघटनेचे पुणे अध्यक्ष सिद्धेश तळवडेकर यांनी या विषयासाठी अथक प्रयत्न केले असून उपाध्यक्ष सागर तळवडेकर तसेच मुंबई अध्यक्ष विनोद नाईक यांनीही विविध स्तरावर पाठपुरावा करून ही मागणी पुढे नेली होती.

खासदार मेधा कुलकर्णी यांनी रेल्वेमंत्र्यांशी सकारात्मक चर्चा झाल्याचे सांगितले असून या मागण्यांवर रेल्वे मंत्रालयाकडून सकारात्मक निर्णय घेतला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. पुणे ते सावंतवाडी दरम्यान नवीन अमृत भारत एक्सप्रेस सेवा सुरू झाल्यास कोकण व पुणे दरम्यानचा प्रवास अधिक जलद, सोयीस्कर आणि किफायतशीर होणार असल्याची भावना कोकणातील प्रवासी व नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# विविध क्षेत्रातील कर्तृत्ववानांसाठी राज्यस्तरीय सन्मान ; प्रस्ताव आमंत्रित . डॉ . अशोक म्हात्रे यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**सायली साळुंके/उरण प्रतिनिधी** : पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र या राज्यस्तरीय पत्रकारांच्या समितीमार्फत आयोजित दशकपूर्ती राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा रविवार, ११ मे २०२६ रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे मान्यवरांच्या उपस्थितीत भव्यदिव्य स्वरूपात पार पडणार आहे.

समाजाच्या उन्नतीसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या, परंतु शासन व समाजाकडून कोणतीही अपेक्षा न ठेवता योगदान देणाऱ्या अनेक गुणी व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पत्रकारिता क्षेत्रातील प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया व सोशल मीडिया, तसेच समाजसेवक, शिक्षक, वैद्यकीय व्यावसायिक आणि विविध क्षेत्रात कार्यरत ‘सप्तज्योती’ (फक्त महिला) यांचा सन्मान व पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

या अनुषंगाने इच्छुकांनी आपल्या कार्याची सविस्तर माहिती (संबंधित क्षेत्रातील कामाचा तपशील) १५ एप्रिल २०२६ पर्यंत डॉ. वैभव वी. पाटील, साई क्लिनिक, शॉप नं. २, मनोकामना हाउसिंग सोसायटी, पेठगाव, कोळखे, रिलायन्स स्मार्ट पॉइंटच्या मागे, पोस्ट ओएनजीसी, ता. पनवेल, जि. रायगड – ४१०२२२ या पत्त्यावर पाठवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, या सोहळ्यानिमित्त प्रसिद्ध होणाऱ्या स्मरणिकेसाठी पत्रकारिता, सामाजिक प्रबोधन, शेतकरी समस्या, महिलांवरील अत्याचार, बदलती सामाजिक परिस्थिती, वैद्यकीय आदी विषयांवरील लेखन साहित्य पाठविण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

# दोघांनी बाउन्सरला केली मारहाण, गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** दोघांनी बाउंसरला लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी निशांत मिलिंद सोनावणे (राहणार कामोठे) आणि अनोळखी ईसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.रुपेश गंगावणे हा सिक्युरिटी बाउन्सर असून कामोठे, सेक्टर 18 येथे राहतो. तो केके सिनेमा, कामोठे येथे कामावर गेला. यावेळी त्याच्या ओळखीचा निशांत सोनवणे हा ड्युटी नसताना आला ते गप्पा मारत असताना गाडीला कट मारल्याविषयी त्यांच्यात गप्पा सुरू होत्या. यावेळी निशांत चिडला. आणि शिव्या देण्यास सुरुवात केली. त्यानंतर तो काकाला घेऊन आला. यावेळी त्यांनी रुपेश याला ठोसे मारायला सुरुवात केली आणि त्यानंतर लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी डोळ्याला मार लागल्याने त्याचा डोळा सुजला आणि त्यांच्या खांद्या जवळ फ्रॅक्चर झाले.

# वसई-विरारमधील ड्रग्ज माफिया आणि बेकायदा नायजेरियन नागरिकांवर ‘मकोका’अंतर्गत कारवाई; मुख्यमंत्र्यांची घोषणा

**वसई**: वसई विरार शहरातील अमली पदार्थांची वाढती तस्करी, बेकायदा पद्धतीने शहरात वास्तव्यास असणारे नायजेरियन नागरिक आणि पबचालकांकडून केला जाणारा नियमभंग असे विविध प्रश्न आमदार स्नेहा दुबे-पंडित यांनी विधानसभा अधिवेशनात मांडले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या गुन्हेगारांवर मकोकासह कठोर कारवाई करण्याची घोषणा केली आहे.

मुंबईच्या लगत वसलेले वसई विरार शहर गेला नाही वर्षांपासून स्थलांतरितांचे, अनधिकृत बांधकामांचे आणि आता गुन्हेगारीचे केंद्र बनले आहे. वारंवार कारवाई करूनही दिवसेंदिवस शहरातील गुन्हेगारी वाढत आहे. तर मंगळवारी विधानसभा अधिवेशनात पार पडलेल्या प्रश्नोत्तराच्या तासात या गंभीर विषयावर आमदार स्नेहा दुबे – पंडित यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.

यावेळी त्या म्हणल्या की, “नालासोपारा व वसई परिसरात नायजेरियन नागरिक मोठ्या प्रमाणावर बेकायदा वास्तव्यास आहेत. यापैकी बहुतांश जणांकडे कोणत्याही कायदेशीर नोंदी किंवा करार नसताना ते शहरात बेकायदा पद्धतीने राहत आहेत. तर शहरातील कोळीवाडा, चिंचोटी, पाचूबंदर, टाकीपाडा, प्रगतीनगर, हनुमान नगर ही नायजेरियन नागरिकांची आणि परिणामी अमली पदार्थ तस्करीचा केंद्र ठरू लागली आहेत.”त्यामुळे शहरात बेकायदेशीर पद्धतीने राहणाऱ्या नागरिकांवर पोलिसांनी कारवाई करणे गरजेचे आहे. तसेच बेकायदा वस्त्यांवर व अशा नागरिकांना आश्रय देणाऱ्या घरमालकांवर कारवाई करण्याची मागणी आमदार स्नेहा दुबे-पंडित यांनी केली. तसेच ते कायदा वस्तीच्या भागात प्रशासन कोंबिंग ऑपरेशन राबवणार का आणि आचोळे व तुळींज पोलीस हद्दीत सक्रिय सराईत गुन्हेगारांवर मकोका कायद्यांतर्गत कारवाई होणार का?, असे प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केले.

यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ६८ नायजेरियन नागरिकांचे डिपोर्टेशन पूर्ण झाले असून १२२ नागरिक डिटेन्शन सेंटरमध्ये असल्याची माहिती दिली. तर पोलिसांना प्रो-अ‍ॅक्टिव्ह तपासणीचे आदेश देण्यात आले असून पारपत्र व व्हिसा तपासणी बंधनकारक करणे, इमिग्रेशन विभागाशी समन्वय साधून ओव्हरस्टे नागरिकांची माहिती मिळविण्यासाठी विशेष यंत्रणा विकसित करणे, बेकायदा वास्तव्यास असलेल्या परकीय नागरिकांना आश्रय देणाऱ्या घरमालकांवर कायदेशीर कारवाई करणे, व्हिसा कालावधी संपल्यानंतर राहणाऱ्यांवर तात्काळ कारवाई व डिपोर्टेशन प्रक्रिया सुरू करणे, असे निर्देशही त्यांनी दिले.

# लोकशिवार : शेतीवरील वन्य प्राण्यांचे संकट



**कोल्हापूर :** भारतातील, महाराष्ट्रातील शेती ही मुख्यत्वे करून पावसावर अवलंबून. त्यातून अनेक संकटांना तोंड देत हिमतीने पिके घ्यायचे. पिके वाढताना किडीचा प्रादुर्भाव होण्यापासून ते अनेक अडचणींचा सामना करायचा. इतके करूनही चांगला दर मिळाला तर नशीब म्हणायचे. अशातच उभी पिके फस्त करणाऱ्या वन्यजीवांचा उपद्रव वाढत चाललेला आहे. इतका की सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था पुणे यांच्या ‘ मानव वन्यजीव संघर्ष – शेतीच्या नुकसानीचा सांख्यिकीय आढावा महाराष्ट्र’ या राज्यव्यापी अभ्यासानुसार वन्य प्राण्यांमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पिकाचे दरवर्षी १० हजार ते ४० हजार कोटी रुपये दरम्यान निव्वळ नुकसान होते. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, खानदेश, विदर्भ हा भाग डोळ्यासमोर ठेवून हा अहवाल तयार करण्यात आला होता. यामध्ये जंगलालगतच्या गावापुरते सर्वेक्षण मर्यादित नसून ते राज्यात घनदाट जंगल नसलेल्या भागांमध्ये सुद्धा दिसून आले आहे.

चांद्या पासून बांद्यापर्यंत भात, ऊस, ज्वारी , बाजरी, फळबागा – भाजीपाला अशा नानाविध पिकांची नासाडी वन्य प्राण्याकडून होत आहे. सह्याद्रीच्या खोऱ्यातील कोल्हापूर, सांगली, सातारा या पश्चिम महाराष्ट्रात गवे, मोर, वानर, लांडोर, शिरूर, आंबेगाव सारख्या भागात बिबट्याचे हल्ले, मराठवाड्यात रानडुकरांच्या झुंडी, कोकण, गडचिरोली, कोल्हापूरच्या दक्षिण भागात हत्तीचा उपद्रव हा नेहमीचाच होऊन बसला आहे. शेती – शेतकऱ्यांना वाघ, बिबटे, हत्ती, गवा, रानडुक्कर, मोर, तरस, लांडगे, अस्वल, काळवीट, वानर, रान कुत्रे, मगर, साप, विंचू अशा अनेक जनावरांचा उपद्रव होतो. त्यांच्या उच्छादाने शेतकरी त्रस्त झाले आहेत. यावर वेगवेगळ्या प्रकारच्या उपाययोजना केल्या जातात. त्या कितपत उपयुक्त यावरही शेतकरी, अभ्यासकांमध्ये मतांतरे आहेत. मानव-वन्यजीव संघर्षामध्ये प्राण्यांच्या अधिवासात मनुष्याचा हस्तक्षेप वाढला असल्याची मांडणी केली जाते. त्याबाबतही मतभेद आहेत.

भारतीय शेतीसमोर वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानाचे मोठे आव्हान आहे. याचा कृषी क्षेत्रावर, ग्रामीण उपजीविकेवर आणि वन्यजीव संवर्धन प्रयत्नांवर गंभीर स्वरूपाचे परिणाम आहेत. वन्यजीवांचे संरक्षण आणि व्यवस्थापन, ज्यामध्ये मानवी वन्यजीव संघर्ष व्यवस्थापनाचा समावेश आहे, ही प्रामुख्याने राज्य/केंद्रशासित प्रदेश सरकारांची जबाबदारी आहे. वन्य प्राण्यांमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेल्या नुकसानाची अचूक , परिपूर्ण माहिती शासन यंत्रणेने गोळा केलेली नाही. वन्यजीवांचे संरक्षण आणि वन्य प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी सरकारने काही पावले टाकली आहेत. त्यामध्ये देशातील वन्यजीव आणि त्यांच्या अधिवासांचे व्यवस्थापन करण्यासाठी वन्यजीव अधिवासांचा एकात्मिक विकास, वाघ प्रकल्प वाघ आणि हत्ती प्रकल्प या केंद्र सरकारच्या योजना आहेत. यामध्ये वन्य प्राण्यांकडून होणाऱ्या शिकारीसाठी भरपाई समाविष्ट आहे.

महाराष्ट्रात गेल्या वर्षात हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्यात ३४८ शेतकऱ्यांचा मृत्यू झाला आहे. २०२२ साली वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात गाय, म्हैस, शेळी, मेंढी असे ७०२१ पाळीव प्राणी दगावले आहेत. मालमत्ता, पीक नुकसान व जखमींचा तर हिशेबच नाही. त्याला कारणीभूत अन्यायकारक वन्यजीव संरक्षण अधिनियम आहे. त्या कायद्यामुळे अशा प्राण्यांना मारताही येत नाही. काही कायद्याप्रमाणे आपल्यावर कोणी व्यक्तीने मृत्यूस कारणीभूत ठरू शकणारा हल्ला केल्यास आपण त्या हल्लेखोराला ठार मारू शकतो. पण एखाद्या प्राण्याने हल्ला केल्यास कायद्याचे संरक्षण नाही. असा विरोधाभास आहे.

वन्य प्राण्यांची वाढती संख्या, जंगलातील त्यांच्या भक्ष्याची कमतरता व आटलेले पाणी स्त्रोत हि काही वन्यप्राणी व मानव संघर्षाला कारणीभूत ठरणारी असल्याने याचा अभ्यास करून सुवर्ण मध्य काढुन वादग्रस्त वन्य जीव संरक्षण अधिनियम १९७२ या कायद्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. वाघ, बिबटे, लांडगे, कोल्हे, रानडुक्करे, वानरे आदी शेतीचे नुकसान करतात. त्यांना या कायद्याच्या परिशिष्टच्या यादीतून वगळावे. त्यात एक नवीन परिशिष्ट टाकून त्यामध्ये मानवी जीवितहानी पोहोचवणारे, त्यांच्या पशुधन, पिके, मालमत्ता आदींची नासाडी करणारे वन्य प्राणी, (नामशेष होण्याच्या मार्गावर नसलेले ) अशा प्राण्यांची मुक्तपणे शिकार करता येईल. ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी सुद्धा वन्य प्राण्यांच्या शिकारीला हवी नियंत्रित परवानगी अशी मागणी केली होती. शिकारीवर बंदी सारखा कायदा फक्त भारतातच अस्तित्वात आहे, असे फोरम ऑफ इंटलेकच्युअल्सचे अध्यक्ष सतीश देशमुख यांनी निरीक्षण नोंदवले आहे.

### मदतीचा हात

वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमुळे मृत्यू झाल्यास किंवा कायमचे अपंगत्व आल्यास शासनाकडून मदत केली जाते. याबाबत डिसेंबर २०२३ मध्ये संसदेत देण्यात आलेल्या माहितीनुसार अशा घटनांबाबत सानुग्रह अनुदानाची रक्कम वाढवली आहे. सध्या केंद्र पुरस्कृत योजना – वन्यजीव अधिवास विकास, वाघ प्रकल्प आणि हत्ती प्रकल्प अंतर्गत देय सानुग्रह अनुदानाची रक्कम याप्रमाणे आहे. वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या – नुकसानाचे स्वरूप सानुग्रह अनुदानाची रक्कम – मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व – १०.०० लाख रुपये , गंभीर दुखापत – २ लाख रुपये , किरकोळ दुखापत – प्रति व्यक्ती २५ हजार पर्यंत उपचारांचा खर्च. मालमत्तेचे/ पिकांचे नुकसान – राज्य/ केंद्रशासित प्रदेश सरकार यांनी ठरवलेल्या निकषानुसार. हि मदत वेळेवर मिळत नसल्याचे गावगाड्यातून सांगितले जाते. फलफितीचा अडसर दूर करण्याची गरज आहे.

### उपाययोजना कितपत फलदायी ?

मोठ्या कष्टाने शेती पिकवली तरी तिचे वन्य प्राण्यांकडून जतन करणे तितकेच महत्वाचे आहे. वन्य प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करणे हे एक महत्त्वाचे आव्हान शेतकऱ्यांसमोर आहे. या घुसखोरीमुळे अतोनात नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. प्राण्यांना इजा न करता किंवा वन्यजीव कायद्यांचे उल्लंघन न करता पिकांचे संरक्षण करण्यासाठी अनेक पारंपारिक आणि आधुनिक धोरणे आहेत. वन्य प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी कुंपण घालणे ही सर्वात सामान्य पद्धतींपैकी एक आहे. प्राण्यांना बाहेर ठेवण्यासाठी ते प्रभावी साधन मानले जाते. पुढील प्रकारचे कुंपण वापरले जाते.

विद्युत कुंपण – हत्ती आणि रानडुक्कर यांसारख्या मोठ्या प्राण्यांना रोखण्यासाठी एक प्रभावी पद्धत. विद्युत कुंपण प्राणी त्यांच्या संपर्कात आल्यावर सौम्य धक्का दिला जातो. यामुळे पीक क्षेत्रापासून प्राणी दूर राहतात. काटेरी तारांचे कुंपण – हरणांसारख्या मध्यम आकाराच्या प्राण्यांना बाहेर ठेवण्यासाठी हे योग्य असल्याचे मानले जाते. काटेरी तार किफायतशीर आहे. परंतु लहान प्राण्यांवर किंवा त्याखाली खोदणाऱ्या प्राण्यांवर ते तितके प्रभावी नसते. जाळीदार किंवा साखळी, दुवा कुंपण – ससे आणि माकडे यांसारख्या लहान प्राण्यांना बाहेर ठेवण्यासाठी हे प्रभावी असले तरी महाग साधन आहे. एकूणच कुंपण घालणे महाग आहे. त्यासाठी नियमित देखभालीची आवश्यकता असते. ते प्राणी आणि मानव दोघांसाठीही धोका निर्माण करतात. स्केअरक्रो आणि आवाज निर्माण करणारे घटक / साधने वापरली जातात. हि साधने सुरुवातीला प्राण्यांना रोखू शकतात. परंतु त्यांची सवय झाल्यामुळे ते कुचकामी ठरतात. पिकांचे नुकसान कमी करण्यासाठी सॅटेलाइट ट्रॅकिंग सिस्टम, रिमोट कॅमेरा मॉनिटरिंग सिस्टम, ड्रोन आणि आर्टिफिशियल इंटेलिजेंस-आधारित सिस्टमच्या वापरावर बरेच प्रयोग आणि चाचण्या सुरू आहेत. त्या वापरात येतील तेव्हा त्याचे फायदे – तोटे कळू शकतील.

वन्यप्राणी पिकांची नासाडी करतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या स्थितीत वन्य प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करणे हे एक बहुआयामी आव्हान आहे.

यासाठी पारंपारिक पद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा मेळ घालण्याचा संतुलित दृष्टिकोन आवश्यक आहे. विविध प्रकारची रणनीती अमलात आणून शेतकरी वन्यजीव आणि पर्यावरणाचा आदर करत त्यांच्या पिकांचे संरक्षण करू शकतात.